नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

८

हेमंत–अंक

श्री. मधुकर मंगरुळकर
सौ. अनसूया वाडेगांवकर
कु. इन्दुमती मोटे
श्री. द. चिं सोमण
श्री अनंत आठले
श्री. वसंत बापट
श्री. राजा मंगळवेढेकर
श्री. म. म. देशपांडे
श्री. वसंत मोहरील
श्री. भ. श्री. पंडीत
श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध
शिवाय ग्रंथ समीक्षा, टिपणें इ० इ०

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

विशेष सूचना—... च्या १९५२ ... १९५३ सालासाठी निवडणुकीची सूचना ... नी या ... वटी याच अंकांत पहावी.

किंमत

वर्ष सहावें | अंक आठवा | आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ :

सौ. कुसुमावती देशपांडे

पु. य. देशपांडे

हरि नारायण नेने

शरच्चंद्र मुक्तिबोध

कार्यकारी संपादक :

वामन चोरघडे

★

कृ. [illegible] चा पत्ता :

"युगवाणी" कार्यालय

विदर्भ साहित्य संघ

उत्तर अंबाझरी रोड

धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

नादलुब्धाच्या आठवणी

रविशंकरांचा कला-विलास

★ मधुकर मंगरूळकर

मयूर दरबारचे उस्ताद अल्लाउद्दीनखाँ साहेब आणि अकबर अली खाँ साहेब यांच्या सरोदवादनाचा जुगल बंदीचा कार्यक्रम सुरू होता. बाजूला आपल्या नाजूक हातांनी आपला विपुल केश-संभार संभाळीत रविशंकरजी बसले होते. त्यांच्या समोर त्यांची सतार पडली होती. अल्लाउद्दीनखाँ साहेबांच्या अप्रतिम कारवाईकडे त्यांचें अत्यंत बारिक लक्ष लागलें होतें. इतकें की 'वा वा' म्हणा‍ायला देखील फुरसत नव्हती— शामियाना गच्च भरला होता. मॉरिस कॉलेजांच्या स्नेहसंमेलन प्रसंगी, १९३७ किंवा ३८ साली घडलेला तो प्रसंग होता.

सुप्रसिद्ध नर्तक श्री. उदयशंकर त्या सुमारास नागपुरास आले होते. रविशंकर, अल्लाउद्दीनखाँ, आलिअकबरखाँ, पं. विष्णुदासजी शिराली ही मंडळी त्यांच्या वृंदवादनाची बाजू संभाळीत असत. सरोदवादनाचा तो कार्यक्रम माझ्या डोळ्यासमोर अगदी जसाच्या तसा उभा आहे. सरोद हें वाद्य मला वाटतें नागपूरकरांनी त्याच वेळीं प्रथम पाहिलें असेल. काहीसें सारंगीसारखें दिसणारें पण आकाराने जवळ जवळ दीडपट मोठें, सेल्युलॉइडच्या पट्टीने तारावर आघातप्रत्याघात करून गीटार या वाद्यासारखी वाजविण्याची पद्धति नवीन होती. बाज सतारीचा पण रूप सारंगीचें. सतारींत असतात तसले पडदे मात्र कुठे दिसायचे नाहीत. त्यामुळे कुठलाहि स्वर काढायचा म्हणजे मींड काढूनच वाजवायचा. श्रीमंतांच्या कुलवधूने अनवाणी चालायचें, म्हणजे तेंहि पायघड्या अंथरूनच. तद्वत अंगुलीनर्तनासाठी जणूं त्या ताराखाली लांकडी भागावर चकाकणाऱ्या पितळेचा पत्रा बसविलेला. अशा या विचित्र दिसणाऱ्या वाद्याची मोहिनी माझ्या मनावर जबरदस्त बसली होती.

हा कार्यक्रम इतका उत्कृष्ट झाला होता की, त्यानंतर रविशंकरांची सतार ...णी ऐकेल हें मला त्यावेळीं खरेंच वाटत नव्हतें त्यादिवशी खाँ साहेबांनी मुक्त ...ी आपला वाद्यविलास रसिकांसमोर सुगंधी फुला प्रमाणे पसरला होता. ...आपापलीं वाद्यें खाली ठेवून रविशंकराकडे नजर टाकतांच, जणूं तीच आज्ञा ... त्यांनी सतार कानाशी लावली. मानेला झटका मारून कानावर आलेला केश... ...सारला. जणूं तेवढ्या अडथळ्यांत एखादा सूर कणभूर लागण्याचा संभव होता. तरकांच्या खुंट्याची मिळवणूक करून त्या मनासारख्या स्वरांत लागल्या असें वाटताच उजव्या करांगुलीच्या मुद्दाम वाढविलेल्या गुलाबी नखाने

सर्व तरफा एकदम भर्रकन वाजविल्या. निरनिराळ्या धातूंच्या नाण्यांची चळत जमीनीवर भर्रकन सांडावी तसा भास झाला. मध्यमांत लाविलेली तार हळूच खेंचून षड्जावर आघात केला. मोठ्या गायकांनी केलेली तपश्चर्या त्यांच्या षड्ज लावण्यावरून दिसून येते. खाँ साहेब फैय्याजखाँ, रामभाऊ सवाई गंधर्व किंवा भीमसेन जोशी यांच्या सारख्यांनी अगदी सुरवातीला नुसता 'सा' भरला म्हणजे रसिक एकमुखाने 'वा' देतात तें कांही उगाच नव्हे. होमिओपाथीचीं औषधें घोटून घोटून जशीं प्रचंड शक्तीचीं तयार होतात, त्याच प्रमाणे स्वर-सामर्थ्याचें आहे. तोच प्रकार मला रविशंकरांच्या नुसत्या षड्जावरच्या अगदी प्रथम आघातातच भासला. वेळ संध्याकाळची असल्यामुळे पुरिया धनाश्रीची त्यांनी एक गत वाजवायला घेतली होती. मला आश्चर्य वाटलें! कांही वेळापूर्वी वाजून गेलेल्या सरोदलहरी आता जणूं सतारीतून पुर्नजन्म घेऊन निघत होत्या. हवेत काही वेळापूर्वी उडवून दिलेलें कबूतर, एखाद्या जादुगाराने नुसता हात वर फेकूनच आणून दाखवावें तसा तो प्रकार मला वाटला. हिंदूंच्या पुर्नजन्माच्या कल्पनेप्रमाणे मघा ऐकलेल्या स्वरांचा आत्मा पुरीयाधनाश्रीच्या कुडीत प्रविष्ट झाला होता. केवढें वादनसाम्य हें! तसें पाहिलें तर विचित्रवीणा किंवा सरोद या वाद्यांत मींडकाम जेवढ्या प्रमाणात आणि ज्या जातीचें निघतें, त्या प्रमाणात सतारीत तें निघत नाही. सरोदसारख्या वाद्यात विशेषतः खर्जात निरनिराळ्या स्वरावर [illegible]हेलावे सुरू झाले म्हणजे जणूं ओंकारनाथ, अमीरखाँ किंवा फैय्याजखाँ साहेबांची 'नोम्तोम्' सुरू झाली असें वाटतें. नागपूला भरलेल्या संगीत संमेलन प्रसंगी बडोदा दरबारचे हाफीजअली खाँ साहेब यांचें सरोद वादन ज्यांनी ऐकलें असेल, त्यांना माझें म्हणणें पटेल. परंतु हा साक्षात्कार रविशंकरांच्या सतार वादनात घडला. किंबहुना त्यांच्या वादनाचा बाज सतार-बाज नव्हेच. सहसा "दाडा-दिडदा" हा बोल ऐकायला मिळायचा नाही. बिसमिल्लांच्या सनईवादनांत ज्या प्रमाणे ख्यालगायकी आहे, त्या प्रमाणे रविशंकरांच्या वादनात ख्यालगायकी आहे. मानवी गळ्याचा आभास उत्पन्न करण्याचें सामर्थ्य ज्या प्रमाणात सरोद या वाद्यांत आहे, त्या प्रमाणात सतारीत नसूनदेखील तोच साक्षात्कार रविशंकरांनी मला पहिल्या बैठकीतच घडविला.

या कलावंताचा कार्यक्रम पुन्हा ऐकायला मिळेल हें मला स्वप्नातहि खरें वाटलें नसतें. कारण उदयशंकरासारखे नर्तक यायला नागपूरात नाट्यगृहहि उरलें नाही. रविशंकरासारखे अव्वल दर्जाचे कलावंत नभोवाणीच्या नोकरीत. पण नागपूर नभोवाणीच्या गेल्या वाढदिवसानिमित्त रविशंकरांचें पुन्हा दर्शन झालें. रविशंकर दिल्ली नभोवाणीत नोकरीला असून देखील त्यांची कला आपल्याला सहसा ऐकायला मिळत नाही. 'ईस्टर्न सर्व्हिसेस ब्रॉडकास्ट' या नांवाने परदेशीय लोकांसाठी जो कार्यक्रम होतो, त्यांत रविशंकर वृंदवादनाचे अभिनव कार्यक्र[illegible] करीत असतात. आंग्ल वृंदवादनाच्या धर्तीवर त्यांचे प्रयोग चालू असून त्यात[illegible] बरेंच यश मिळविलें आहे.

नभोवाणीवरील कार्यक्रमात त्यांचा कार्यक्रम असलेलें [illegible]ा चांगली गाजली. श्री. गजानन बुवा जोशी यांचे फिड्ल वादन आणि सौ. हिराबाई बडोदेकर यांच्या समवेत त्यांचाहि कार्यक्रम होता. पण गुण आणि रस या दोन्ही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दर्शीनी त्यांचाच कार्यक्रम सरस झाला. निवडक मंडळी समोर होती. कार्यक्रम आटोपला. पण वेळेचें बंधन चटकन पडल्यामुळे सगळ्यांनाच राग आला. श्री. अनूपचंद बेदी स्टेशन डायरेक्टर डॉ. राव यांना म्हणाले, 'हम तो प्यासे ही रह गये—'

डॉ. राव म्हणाले, 'आपण विचारा रविशंकरजींना'

आणि समोर जमलेल्या रसिकांची ती विनंति त्यांनी मान्य केली. हा ध्वनिक्षेपित न झालेला कार्यक्रम अतिमधुर होता. वेळेचें बंधन नव्हतें. निवडक शेलकी रसीली मंडळी हजर होती. चंद्रकौंसापासून अस्सल पंजाबी धुन व नृत्यगीतें त्यांनी वाजवून तास दीडतास रसिकांचें मनरंजन केलें. तो कार्यक्रम ऐकण्याचा ज्यांना सुयोग आला त्यांना मी धन्य समजेन.

पण त्यांची मोठी बैठक झाली ती 'ललित कलामंडळा'तच. सर्व सामान्य लोकांच्या नजरेस ते याच वेळेला पडले. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाने सगळ्यावर वजन धरलें होतें. कलावंत हा न सांगून देखील ओळखूं येतो. रविशंकर या बाबतींत फार भाग्यवान. विपुल केशपाश, किरकोळ पण लवचिक शरीरयष्टी, टपोरे हृदयाचे ठाव घेणारे डोळे आणि सरळ नासिका, लांब सडक बोटें आणि अळता लावून लाल केल्यागत हातापायांचे तळवे. पौर्णिमेच्या सुप्रभेसारखा त्यांचा गौर वर्ण. रविशंकर एकंदरीत नाजूक दिसतात. हिऱ्याची अंगठी असलेलें डाव्या हाताचें बोट, बरेलीची पंचरसी पोलादी तार मध्यमापासून षड्जापर्यंत खेंचू शकत असेल हें प्रथम खरेंच वाटत नाही. डोळ्यांनी पाहिल्या आणि कानांनी ऐकिल्या म्हणूनच या गोष्टी खऱ्या मानायच्या एवढेंच !

साऱ्या तरफा नीट जुळवून त्यांनी तार खेंचून षडजावर आघात केला. आणि त्याबरोबर खालच्या सुरेल तारांनी जणु हुंकार दिला—

"हां, होऊंद्या सुरवात—सबठीक है—' उत्कृष्ट मायक्रोफोन असला म्हणजे या हुंकाराची मजा खरी चाखायला मिळते. एरवी बैठकीवर बसल्यानंतर खुंट्यांची चाललेली ही मिळवणूक केल्यानंतरहि तो कलावंत मनाशी उद्गारतो '—अजून ठीक जमल्या नाही तरफा—'! सर्व साधारण कलावंताला या उद्गारात कलावंताची आढ्यताच दिसते. पण त्या खऱ्या अर्थी "जमल्या" नंतर जी मजा येते ती घ्यायला कान चांगलाच तयार असावा लागतो. एखादा क्वचित क़णसूर लागला असला तर हवी ती खुंटी चटकन ओळखून ती चटकन नीट करीत— त्या खुंटीने त्यांच्या कानांत गोड तक्रार केली होती.

...करांनी त्यादिवशी हिंडोल—बहार, नट-भैरव, मालकौंस, केदाराचे काही ... प्रकार ऐकवले. दाक्षिणात्य पद्धतीच्या रागांचा त्यांच्या जवळ साठा बराच ... रविशंकरांचें काम मात्र सरळ नाही. सारें आडवें. समेवर यायला देखील वेगळीच चाल... राग घ्यायचा तो देखील अनवट; ताल घ्यायचा तो देखील सवारी, गजझंपा, धमार असा—आणि खेंचकाम असें विचित्र की समेवर कुठून, कसें आणि केव्हा येतील याचा नेम नाही. तालावर त्यांचें असीम प्रभुत्व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. अल्लाउद्दीन खाँ साहेबांजवळ कठीण तालात पलटे तयार झाल्यामुळे त्यांना साधारण तबलिया चालत नाही. आपल्या गुरूची त्यांनी इतकी सेवा केली की गुरूंनी देखील त्यांना मुक्तहस्तांनी आपली सगळी विद्या दिली. इतकेंच नव्हे तर आपली आवडती कन्या देऊन त्यांना आपलें जांवई करून घेतलें. सौ. अन्नपूर्णा देवी या देखील प्रचंड तयारीने सतार वाजवितात. या दोघांचा जुगल बंदीचा कार्यक्रम काही वर्षांपूर्वी मुंबई केंद्राहून ध्वनिक्षेपित झाला होता. सरस निरस ठरवायचें कुणी व कसें ! १

ललित कला मंडळात एक मुसलमान तबलावादक आपण होऊन पुढे आले व तबल्यावर बसण्याची त्यांनी इच्छा दर्शविली. मुसलमान तबलिया सहसा आपण होऊन असली हिंमत करणार नाही हें रविशंकरांना माहित होतें. त्यांनी समंती दिली. समोरच्या लहानशा चांदीच्या डबीतून बोटांना पोमेट लावलें. जास्त झालेलें भांगात बोट फिरवून पुसून टाकलें आणि भरकन् तान घेऊन त्यांनी वसंत-बहारातला 'धमार' सुरू केला. नाठाळ घोड्यावर मांड नीट जमवून, लगाम खेचून अर्धातास मस्ती जिरविल्यानंतर जनावर हवें तसें वाकतें. रविशंकरांनी आतापर्यंत एकताल, तिलवाडा यातील ख्यालाची किंवा द्रुत लयीची अशा अनेक चिजा वाजविल्या. पण त्यांनी एकदम धमार घेतल्याबरोबर त्यांच्या समयसूचकतेचें त्यांना कौतुक वाटलें. लय देखील अशी गाडून धरली होती की अर्धातासपर्यंत 'कत् धिट् धिट् धाऽ कत् तिट तिट ताऽ' या पलीकडे मियाँ साहेब कांही करूं शकले नाहीत. स्वतंत्र बादनाला असल्या धिम्या आणि आडव्या तालात फारशी गुंजाइश नसते. मग जणूं त्यांनाच कींव आली आणि एक चीज त्यांनी सुरू केली आणि तबलियाला मुक्तहस्ताने उधळूं दिला. आकाशात काळे काळे मेघ आलेले असावेत, विजा कडकडत असाव्यात, घन गंभीर आवाज होत असावा त्या प्रमाणे वाटत होतें. शेवटी जणूं कुस्ती बरोबरीत सुटली. दोघांनी एकमेकांच्या हाताला हात लावले आणि पावसाच्या सरीप्रमाणे टाळ्यांचा कडकडाट झाला.

या कार्यक्रमाला सौ. हिराबाई बडोदेकर मुद्दाम हजर होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ७॥ ला नभोवाणीची बैठक असूनहि त्या बराच वेळ पर्यंत थांबल्या. एकाच्या सुमारास त्या जायला निघाल्या. श्रीमंत बाबूराव देशमुखांची मोटी लिंकन फोर्ड त्यांना घेऊन निघाली. त्यावेळी मालकौंस सुरू होता आणि कोमल गांधारावर न्यास सुरू होते. बाहेरून मोटरचा हॉर्न दोनदा वाजला. रविशंकरांनी जणूं त्या आवाजाला प्रत्युत्तर म्हणून कोमल गांधारावरच दोनदा आघात केला आणि रसिकांकडे डोळे लावले. मोटरचा हॉर्न कोमल गांधारातच ओरडला होता. त्या काकतालीय न्यायाने साधलेल्या प्रसंगावधानाने, श्रोतृवृंदाने रविशंकरांचा टाळ्या वाजवून सन्मान केला. स्वरांचें साम्राज्य सुरू झालें म्हणजे अचेतन वस्तु देखील त्या स्वरांना हुंकार देतात हें अनेकदा माझ्या प्रत्ययास आलें आहे. गायकाचें गाणें चाललेलें असताना घड्याळाचे ठोके त्याच स्वरात पडत असल्याचे उदाहरण माझ्या ऐकिवातलें आहे.

या कार्यक्रमाचे लागोपाठच तीनचार दिवसांनी रविशंकरांचा लखनौ नभोवाणीवरून एक उत्कृष्ट कार्यक्रम ऐकायला मिळाला होता. अलिअकबर खाँ आणि रविशंकर यांची सरोद आणि सतार यांची जुगल बंदी, त्यांची संगत रामपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दरबारचे सुप्रसिद्ध तबलिये उस्ताद अहमदजान तिरखवा साहेब करीत होते. असा अपूर्व योग फारच विरळा 'मांड—खमाज' सारखा मिश्र राग त्यांनी निवडला होता. खर्जातलें काम करावें अलिअकबर खाँ साहेबांनी आणि मध्य सप्तकातलें किंवा तार सप्तकातलें रविशंकरांनी. मनांतले गद्गद्लेले स्वर काढावे अलि अकबरांनी आणि तार सप्तकांत रविशंकरांनी त्या सुरांची आंस धरावी.

'शकुंतला' फिल्म मध्ये कण्व मुनि आणि शकुंतला यांच्या निरोपाचा प्रसंग चित्रित केला होता त्याची मला आठवण झाली. दोघांच्या मध्यें अथांग नदी होती. इकडच्या तीरावरून कण्वांनी उपदेश करावा. नदीच्या पृष्ठावरून कण्वांचा वात्सल्यानें गहिंवरलेला आवाज शकुंतलेकडे येई आणि सासरी जाण्याच्या गोडीने साखरलेला परंतु पितृविरहाच्या दुःखाने भारावलेला शकुंतलेचा आवाज बारीक ऐकू येत असे. या प्रसंगाचें ध्वनिमुद्रण उत्कृष्ट झालें होतें. ती जुगलबंदी ऐकून मला हा प्रसंग आठवला. शकुंतलेच्या पदराला धरून ओढणारें हरिणपाडस जणूं चौखुर उधळलेलें असावें त्याप्रमाणे अहमदजान तिरखवासाहेबांचा तबला चालला होता.

रविशंकरांचें सतारवादन म्हटलें म्हणजे कालिदासाची ती निरागस शकुंतला आठवते. खरें पाहिलें असता मला सतार हें वाद्य आवडत नाही. त्यात व्हायोलिन किंवा सारंगी यासारख्या तंतु वाद्यातील स्वरांचा अखंड ओघ नसतो. त्यामुळे त्यातली तान किंवा 'दिडदा' नेहमी खटकतो. विशेषतः लय वाढल्यानंतर तार षडज् धरून सप्त तारांपैकी अखेरच्या अतितारसप्तकाच्या तारेवर सारखा आघात करून स्वर टांगता ठेवण्याची किमया तबलजीला दमविण्यासाठी असते. पण त्यात देखील इतर सहा तारांना 'मिजराफ' लागल्यामुळे जो झंकार होतो तो कधीकधी असह्य होतो. वेळीअवेळी कोटाच्या खिशांत स्टेथॉस्कोप ठेवून आपल्या धंद्याची जाहिरात करणाऱ्या डॉक्टराप्रमाणे तारेची 'मिजराफ' आपल्या तर्जनीत आंगठीप्रमाणे वागविणारे सतारियेहि मीं पाहिलें आहेत. पण रविशंकरांचें सारें वेगळेंच. स्वतंत्र वादनाबरोबरच, उदयशंकराच्या नृत्यकथाप्रमाणे त्यांनी वृंदवादनांतून कथा गुंफायचे प्रयत्न केले आहेत. त्यांचे 'नवभारत' 'गांव की गोरी' वगैरे कार्यक्रम नभोवाणीवरून ध्वनिक्षेपित झाले आहेत.

नागपूराचा त्यांचा कार्यक्रम जवळ जवळ साडेतीन चार तासांचा झाला एखाद्या नर्तिकेने पायातील पैंजण वाजवीत नाचाचे निरनिराळे तोडे काढावे, ठुमकत ठुमकत कबूतरासारखे पुढे यावें, गिरकी घेऊन पुन्हा मूळ स्थळी यावें हे सारे प्रकार त्यांच्या वादनातून व्यक्त होतात. मध्यंतरात ते बाहेर येऊन मला म्हणाले,

'—आमच्या तिकडे सतारीचा कार्यक्रम इतका मोठा होत नाही. तास दीडतास हद्द झाली—'

मी म्हणालों, 'पंडितजी! नागपूरच्या लोकांची अजून तसल्ली झाली नाही.—'

'हां ठीक है' रविशंकर म्हणाले, 'यहाँके लोक बहोत निचोडके सुनते हैं—'

रविशंकरांचे ते उद्गार अजून माझ्या कानांत घुमत आहेत. नागपूरकर रसिक ऐकतात मनोलावून पण ते अज्ञातशाचें नाही. जातीच्या कलावंताला मानाचा मुजरा कोणता रसिक देणार नाही!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुजाणांना आवाहन

सौ अनसूया वाडेगांवकर.

नियतकालिकांच्या व्यवसायाशी माझा संबंध असल्यामुळे प्रस्तुत लेखातील मुद्दा उपस्थित करण्यासंबंधी मी पुष्कळ दिवस पुष्कळ प्रकारे विचार केला. माझ्या विचारासंबंधी कुणाचा मतभेद होईल अशी शंका मला नाही. पण एका निर्विवाद गोष्टीचें व्यवहारांत कसें रूपांतर करतां येईल याबद्दल मला संशय आहे. तथापि माझें म्हणणें असें की एकादी गरज अत्यावश्यक म्हणून मान्य झाली की हरप्रयत्नाने ती पूर्ण करण्यांतच माणसाचें वैशिष्ट्य आहे. आजारांत अमुक एक औषध बरें करणारें असल्याचें माहित झाल्यावर त्यासाठी पैसा खर्च करावा की करूं नये असा विचार करणारा माणूस फारसा व्यवहारी समजला जात नाही.

आज आपल्या स्वतंत्र देशासमोर मूर्त आणि अमूर्त असे अनेक निकडीचे प्रश्न उभे आहेत. कांही गोष्टी जर तावडतोब अंमलात आणल्या नाहीत तर देशांतला असंतोष उत्तरोत्तर भडकत जाईल. अन्न वस्त्र निवारा, आवश्यक वस्तु यांची टंचाई आणि महागाई आज पराकोटीला पोचली आहे. किंमती ४०० पटीने वाढल्या आणि पैसे खर्च करून आपल्या गरजा समाधानकारक रीतीने पूर्ण होत नाहीत ही देखील ओरड आहेच. देशाचें उत्पादन वाढलें पाहिजे व त्यासाठी जीं जीं साधनें असतील तीं जास्तीतजास्त कार्यक्षम बनवून वापरलीं गेलीं पाहिजेत. हें सर्व उघड दिसत असलें तरी त्याची अंमलबजावणी समाधानकारक रीतीने आज होत नाही.

देशाचें जीवनमान वाढविण्याची योजना व उद्दिष्ट प्लॅनिंग कमिशनने आपल्या रिपोर्टांत नमूद केलें आहे व जनतेच्या सहकार्याला आवाहन केलें आहे. ही जनता सहकार देईल पण त्यासाठी कांही गोष्टींची उकल व्हावयास हवी.

पहिली गोष्ट जनतेची वृत्ति सुधारणा इच्छिणारी अशी हवी. तिचा आत्मविश्वास जागा व्हावयास हवा. उत्पादनाच्या घटकांपैकी अत्यंत महत्त्वाचा घटक श्रम हा होय. त्याची कार्यक्षमता श्रमिकाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. श्रमिक मनाने आणि शरीराने निरोगी असला तर त्याच्या ठिकाणी विश्वास व शक्ति वाढते. शरीराच्या शक्तीपेक्षाहि मनाची शक्ति ही अति महत्त्वाची आहे. मनाने एकादें काम करावयास घेतलें तर शरीरहि साथ देतें.

हिंदुस्थानच्या माणसाचें मन कसें आहे? त्या मनांत कर्तव्याची जाणीव आहे कां? त्याला सुधारणेची उत्सुकता आहे कां? आपलें जीवनमान वाढलें पाहिजे असें त्याला वाटतें कां? या सर्व प्रश्नांची उत्तरें नकारार्थीच आहेत. जीवनमान वाढण्यास दोन गोष्टी हव्या असतात. एक, गरजा पूर्ण करण्याची साधनें हवींत आणि तीं साधनें योग्य रीतीने राबवून घेण्याचें शहाणपण हवें. हें शहाणपण फार महत्त्वाचें आहे. तें नसलें आणि साधनें कितिहि समृद्ध असली तरी उपयोग नाही. पैसे भरपूर असले म्हणजे एखाद्याची रहाणी चांगली असतेच असें नाही. त्या पैशाचा योग्य उपयोग करण्याची अक्कलहुषारी त्या माणसांत असली पाहिजे. ही अक्कल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किंवा शहाणपण ज्या ज्या गोष्टींने वाढेल असे प्रयत्न करणें जरूर आहे आणि हें शहाणपण खची होईल अशा गोष्टी टाळणें ही तर फारच महत्त्वाची बाब आहे. प्रकृति सुधारण्यासाठी आजाऱ्याला औषध देतात आणि त्याचें पथ्यपाणी नीट चालून त्याला आरोग्यविघातक तळकट तेलकट खाण्याचा मोह होऊं नये म्हणून घरीं असले पदार्थ वर्ज्य करतात. मलेरियाचा प्रकोप टाळण्यासाठी औषध आणि आजुबाजूची स्वच्छता असा दुहेरी कार्यक्रम योजतात.

या दुहेरी कार्यक्रमापैकी दुसरी बाजू मला या ठिकाणी मांडावयाची आहे आणि म्हणूनच व्यापारी मालाच्या जाहिरातींचा विषय मी घेत आहें.

जाहिरात करणें ही एक आजच्या युगांतली अत्यंत महत्त्वाची कला आहे. जाहिरातींचें शास्त्र अत्यंत झपाट्याने वाढत आहे आणि आपली अपरिहार्यता उत्तरोत्तर सिद्ध करीत आहे. पण आपल्या देशांत ज्या जाहिराती वृत्तपत्रें व नियत-कालिकें प्रसिद्ध करतात त्यांना या शास्त्राची व कलेची कसोटी लावणें अशक्य आहे. कशा असतात या जाहिराती ?

त्या खोट्या असतात. फसव्या असतात. अवास्तव असतात आणि त्यामुळे या स्वतंत्र देशातील असंख्य अज्ञानी नागरिकांची अक्षरशः नागवण होते. त्या जाहिरातींचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या मनावर व शरीरावर प्रतिकूल असा तर होतोच पण मुख्य म्हणजे सर्वच भल्या गोष्टींवरचा त्यांचा विश्वास उडून राष्ट्राचें मोरेल खची होण्याची भीति वाढवते. जाहिरात म्हटली की तिच्यांत अतिशयोक्ति असणारच असें आज मानलें गेलें आहे. जाहिरातींतील विधानें भरमसाट असतात हेंहि पुष्कळांना कळतें पण वळत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

वृत्तपत्रांत अनेक प्रकारच्या अनेक वस्तूंच्या जाहिराती छापल्या जातात. त्या छापल्यावाचून वृत्तपत्रें चालूं शकत नाहीत असें म्हटलें जातें. कधी कधी तर वृत्तापेक्षाहि जाहिरातीच जास्त असल्याचें आढळून येतें. सौंदर्य वाढण्यासाठी डोळ्यांत काजळ घालण्याऐवजी काजळांत डोळे घालण्यासारखाच हा प्रकार होतो.

पण या इतक्या उमाप जाहिरातींनी देशाचें उत्पादन वाढलें आहे आणि भरपूर वस्तु तयार होत आहेत असा जर कोणी कयास बांधला तर तें चूक आहे. साध्या औषधांच्या जाहिराती पहा. कांहींमध्ये रोग बरा करण्याची हमखास हमी दिलेली असते. अमक्या अमक्या गगनचुंबी पहाडांत लोककल्याणार्थ तपस्या करीत असलेल्या साधूने मानवाच्या प्रेमाने विगलित होऊन बहात्तर रोगावर एक मुळी शोधून काढली असते आणि तिने गुण न आल्यास दोनपासून दहा हजार रुपयांपर्यंत इनाम जाहीर केलें असतें. 'तुम्ही पांढऱ्या कोडाने त्रस्त झालेले आहांत कां ? मग आमचें औषध लावून पांच मिनिटांत जन्मभराचें समाधान मिळवा. त्या समाधानांत भर घालण्यासाठी आम्ही औषधासोबत तुम्हाला अत्यंत सुंदर असा रेशमी रुमाल देऊं ! " " महात्माजी डोक्याला तेल लावीत होते काय ! जर त्यांनी लावावयाचें ठरविलें असतें तर आमचेच बहुगुणी तेल त्यांनी वापरलें असतें. " " हिंदुस्थानची स्वतंत्र घटना तयार होऊन स्त्रीपुरुषांना समान दर्जा मिळाला आहे ना ! मग स्त्रियांनो, आपल्या पुरुषांचा जांच सहन कशाला करता ! उलट त्याला आमच्या वशीकरण यंत्राने वश करून विवाहाचा आनंद मनसोक्त लुटा "

 " संसार बेचव झाला का ! मग आमचें रतिसुखाचें सर्वांग सुंदर पुस्तक घेऊन

स्वर्गाची मजा लुटा.” एकमेव औषध व एकमेव इलाज ही तर मुळी या जाहिरातींची खुमारी असते. वस्तुस्थिति अशी आहे की वर उल्लेखिलेल्या एकाहि गोष्टीचा इलाज औषधाने किंवा वाचनाने होत नाही. वैद्यकशास्त्र इतक्या संशोधनानंतरहि सांगतें की मलेरिया व आणखी एखाद दुसरा रोग सोडल्यास इतर रोगांवर हमखास औषध नाही आणि या जाहिरातींत तर स्वस्त, सुखावह, स्वादिष्ट औषधें स्वर्ग-सुखाची वाट दाखवितात. लिहायला संकोच वाटेल इतक्या हीन अभिरुचीच्या शद्बांत ह्या जाहिराती जेव्हा वाचक वाचतो तेव्हा त्याच्या मनावर काय संस्कार होतो? परवा जीवनाची सडेतोड आणि बुद्धिनिष्ठ चर्चा करणाऱ्या एका मासिकांत वाघास पाहून मच्छर पळतें तसे असाध्य गुप्त रोग पळवून इच्छा त्या स्त्रीला वश करून घेणाऱ्या ताईताची जाहिरात वाचावयास मिळाली. ज्यांनी ती छापली त्यांचा तिच्यावर विश्वास तर नाहीच पण वाचकालाहि असें वाटतें की ज्यांना हें छापणें रुचतें त्यांच्यात जीवनाबद्दल व बुद्धीबद्दल खरी निष्ठा असणें संभवतें कां? अशी शंका आली की मासिकाचा उद्देश तर धुळीला मिळतोच पण त्यांतल्या विचारांनाहि हिणकसपणा येतो. दारुड्याच्या तोंडून सद्गुणवर्णन झालें म्हणजे परिणाम तर होत नाहीच पण सद्गुणावरील विश्वास ढळतो. याशिवाय आणखी काय काय होतें तें पाहू. समजा दम्याने त्रस्त झालेला माणूस जडीबुटीची जाहिरात वाचून दहा रुपये खर्च करण्याचें ठरवितो. त्या माणसाचें उत्पन्न समजा साठ रुपये आहे. हिंदुस्थानचें माणशी उत्पन्न लक्षांत घेतां हे साठ रुपये उदाहरणालाहि जास्तच आहेत. ६० रु. मासिक मिळविणाऱ्याच्या अंदाज पत्रकांत गरजेच्या अन्य वस्तु इतक्या असतात की त्याला २ रु. हि आजच्या दिवसांत जीवनोपयोगी वस्तूंव्यतिरिक्त खर्च करण्याची ऐपत नसते. मग तो दूध, कपडे, घरभाडें यापैकी कशात तरी कपात करून ती वस्तु घेतो आणि शारीरिक गैरसोय पत्करतो. गुण आला नाही म्हणजे चिडतो. आपली फजिति झाल्याचें कळल्यास लोक मूर्ख म्हणतील म्हणून चुप बसतो आणि मनाची शक्ति ढांसळते. त्याची उमेद, उत्साह खचतो. अशा असंख्य माणसांची उगीच फसवणुकीने खची झालेली मानसिक शक्ति जर एकत्र अजमावली तर मन दडपल्याशिवाय व राष्ट्राची ही केवढी हानि आहे असा विचार मनाला अस्वस्थ केल्याशिवाय रहाणार नाही. ह्या जाहिराती माणसाच्या कमकुवत, नाजुक मनोभागाला आवाहन करणाऱ्या असतात. प्रत्येकाला वाटतें आपण सुंदर दिसावें, आपल्याला लोकांनी महान म्हणावें, आपला अधिकार सर्वत्र चालावा, आपल्याला आधिव्याधि नसाव्यात आणि त्यामुळे असंख्य लोक या जाहिरातींना फसून आपले द्रव्य व्यर्थ दवडून त्या द्रव्याने ज्या इतर गरजा आपल्या व आपल्या कुटुंबाच्या पूर्ण झाल्या असत्या त्यापासून वंचित रहातात आणि मनःस्वास्थ्य दूर होण्याऐवजी उलट वाढतें. ही अस्वस्थता मानसशास्त्रदृष्ट्या अनेक वाटांनी उद्रेक पावते व समाजाचें मानसिक आरोग्य बिघडवितें. दारुडा दारूच्या नशेमुळे तर त्रास देतोच पण आजच्या दिवसांत अत्यंत महाग झालेला पैसा सगळ्यांचा तळतळाट साहून दारूंत ओतला म्हणून त्याची त्याला जो अदृश्य जाणीव असते तिनेहि अधिक चेकाळतो.

वरें, या जाहिरातींत अश्लीलता, अनौचित्यच असतें आणि वस्तु योग्य असती तर तेंहि एकपरी साखरेबरोबर मुंगळे पत्करतो तसें पत्करलें असतें. पुष्कळदां तर भाषेच्या, संप्रदायाच्या अर्थाच्याहि मर्यादा उल्लंघिलेल्या दृष्टीस पडतात. एका साबणाची जाहिरात “तो त्वचेला फार कृपाळू लागतो” अशी केलेली होती. या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाक्याचा अर्थ शोधावयासाठी सगळें भाषाशास्त्र पहिलें जाळून टाकावें लागेल. नटींच्या 'दिलखेचक' आणि 'भावस्फोटक' कामाबद्दल तर बोलायची सोयच नाही. पण ही अतिशयोक्ति आणि अनर्थकारी अप्रस्तुतता क्षम्य केव्हां तर ज्या नगाची जाहिरात करतां तो नग नांव घेण्यासारखा असल्यास. तेथे स्थिति अशी की शक्ति-वर्धक मदनामृतांत बाभळीची साल, तर हजार-भाषा शिकविणाऱ्या ५ रु. किंमतीच्या आठ पानांच्या पुस्तकात शंभर शब्द आणि पाणी थंड करणाऱ्या यंत्राच्या नांवाने साधें तीन पैशाचें गाडग्यांचें पार्सल पदरीं पडतें.

फलित काय तर जनतेची अभिरुचि हीन होते, मनाची ताकद खचते, खच्चीत बाहिशेबीपणा येतो, शरीराची माती होते आणि बुद्धीवरचा विश्वास उडतो. नियत-कालिकें चालविणाऱ्यांना समाजाचा बुद्धिनिकष मानतात आणि त्यांनी द्रव्यासाठी ह्या व्रताला हरताळ फासण्याचें ठरविलें तर सगळेंच संपलें!

द्रव्याचा मुद्दा कमी महत्त्वाचा नाही हें मला स्वानुभवाने माहित आहे. पण द्रव्य मिळविण्याचे मार्ग हीनच असले पाहिजेत असा मात्र माझा विश्वास नाही. स्व[illegible] देशांत उद्योगधंद्यांची वाढ होणारच. आज ना उद्यां आवश्यक वस्तूंचे व पय[illegible]ची संख्या वाढणारच. चांगल्या पारखलेल्या वस्तूंची जाहिरात केल्याने पैसे मिळणारच नाहीत असें नाही. "तुमच्या खोट्या जाहिरातींनी माझ्या नियतकालि-काची प्रतिष्ठा जाते" असें स्पष्ट कळविणाऱ्याबद्दल अनादर वाढल्याचें उदाहरण मला आढळलें नाही. उलट माझ्या शब्दावर विश्वास वाढल्याचाच प्रत्यय मला आलेला आहे. पैशाचें सोंग आणतां येत नाही हें खरें, पैशासाठी सगळीं सोंगें करावीं लागतात हेंहि दुर्दैवाने खरें पण त्यांतहि विवेक संभाळला नाही तर बुद्धिमंताचें बुद्धि-वादित्व व माणुसकी कशाला म्हणावयाचें? लोकशिक्षणाच्या दृष्टीव्यतिरिक्त आणखीहि एका दृष्टीने हा विचार करता येण्यासारखा आहे. आज छापण्याचा कागद दुर्मिळ झाला आहे. परदेशी मालहि पुरेसा येत नाही. कागदाची परिस्थिति अशीच राहिली तर वृत्तपत्रांना "विरामा" वाचून गति राहणार नाही अशी साधार भीति वाटूं लागली आहे. त्यामुळे कागदाचा उपयोग सत्कारणीं आपलें उद्दिष्ट साध्य करण्या-कडेच जपून करावयास हवा. अज्ञ निराश जनतेच्या हातीं वृत्तपत्र आपण देतों तें त्यांच्या शिक्षणाच्या व हिताच्या उद्देशाने, अश्लील व खोट्या जाहिरातीसाठी नव्हे. म्हणूनच बुद्धिवंतांनी, जाणत्यांनी व सरकारनेहि प्रयत्न करून जागरूक राहिलें पाहिजे आणि सरकारने तर कायद्याचा अवलंब करूनहि ह्या फसवणुकीला आळा घातला पाहिजे. देशाच्या जीवनमानाच्या, आरोग्याच्या, आर्थिक सुस्थितीच्या दृष्टीने हें अपरिहार्य आहे. हें आळा घालण्याचें वातावरण निर्माण करण्यासाठी जाणत्यांनी पुढे झालें पाहिजे आणि अशा समंजस, कल्याणकारी समाजहितचिंतकाचें लक्ष आकृष्ट करण्यासाठीच साहित्य व जीवनाचें सौंदर्य वाढविण्याचा उद्देश समोर ठेवलेल्या साहित्यसंस्थेच्या मुखपत्रांतून हे माझे विचार मांडून मी सुजाणांच्या कर्तव्यभावनेला आवाहन करीत आहें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केशवसुत आणि Bee : साम्यदर्शन.

★

कु. इन्दुमती मोटे.

१८८५ साली हिंदी राजकारणाप्रमाणे मराठी साहित्यांतहि स्वातंत्र्योन्मुख युगाचा प्रारंभ झाला. केशवसुतांनी 'स्वप्राणाने' फुंकलेल्या 'तुतारी'चे पडसाद महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत दुमदुमूं लागले आणि या नवीन युगांतील पाईक म्हणवून घेण्यांत अनेक कवींनी धन्यता मानली. कालाच्या दृष्टीने ज्येष्ठ असणारे रे. टिळक 'सकल गुणांहि सदा नवें' असें आपलें 'रणशिंग' घेऊन तुतारी संप्रदायांत सामील झाले तर

'केशवपुत्राचा मशहूर । गोविन्दाग्रज चेला सच्चा'

असें सांगून आपली काव्यस्फूर्ति ही आधुनिक कविकुलगुरु केशवसुतांचें ऋण असल्याचें मोठ्या अभिमानाने गोविन्दाग्रजांनी नमूद केलें. Bee कवि मात्र स्वतंत्र प्रज्ञेचे 'एकांडे शिलेदार' होते. त्यांनी कोणाचें शिष्यत्व पत्करलें नाही किंवा कोणी आपलें पत्करावें अशी अपेक्षा बाळगली नाही. या त्यांच्या वृत्तीमुळेच 'केशवसुतांच्याच काय पण कोणत्याहि समकालीन कवींच्या काव्याचा सुतराम्‌देखील संस्कार त्यांच्यावर झालेला नाही' या आचार्य अत्रे यांच्या विधानाची सत्यता त्यांचें काव्य वाचूं लागतांच पटूं लागल्यासारखी वाटते.

केशवसुतांना कोणी क्रान्तिकारक कवि म्हणोत किंवा उत्क्रान्तीचा प्रतिनिधि समजोत पण त्यांच्या काव्यापासून काव्याकडे बघण्याच्या दृष्टीकोणांत आमूलाग्र बदल झाला यांत शंका नाही. थाटदार घाटाची रचना किंवा नीतिपाठ म्हणजे काव्य नव्हे असें सांगणाऱ्या आधुनिक मराठी कवितेचें वैशिष्ट्य काय होतें ? 'अन्तरंग ओथंबून ओसंडे ती सुंदरता' हें तिचें स्वरूप होतें. ती कवीच्या आत्मप्रत्ययांतून स्फुरलेली असते. कवीची छाया तींत न्याहाळतां येते. इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनाचा परिणाम केशवसुतांच्या विचारवर झाला हें निःसंशय. पण त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे की केशवसुतांनी ते विचार आत्मसात् केले. त्यांच्याशी ते समरस झाले. त्यांना उत्कटतेने जें वाटलें तें काव्यरूपाने बाहेर पडलें. म्हणून त्यांच्या काव्यांत त्यांच्या व्यक्तित्वाची साक्ष आहे. जिवंतपणा आहे. 'आत्मभावनेचा आविष्कार' हें केशवसुत संप्रदायाचें वैशिष्ट्य आहे. उलट Bee ची प्रतिभा सामान्यत: आत्मवृत्तिपर नसून परवृत्तिपर आहे. म्हणूनच निर्भेळ भावगीतांचा त्यांच्या काव्यांत अभाव आहे. निर्विवाद स्वविषयक म्हणतां येईल अशी त्यांची एकच कविता ती म्हणजे 'नांवांत काय आहे ?'

काव्याच्या अंतरंगांतील हा फरक बहिरंगावरहि परिणाम केल्याशिवाय राहिला नाही. Bee ना आधुनिक मराठी काव्याविषयी प्रेम वाटत होतें, भावाविष्करणाच्या नूतन धाटी नूतन भाषावेष व प्रौढ कलाढ्यत्वाचें वारें अद्याप जिच्या अंगी वाजूं लागलें नव्हतें अशा तिच्या मुग्ध सौन्दर्याने ते मोहून गेले आणि—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सोप्या सोप्या शब्दांनी, स्फूर्ति सूत्राने गुंफोनी
मंजुळ मंजुळशीं गाणीं, रत्नुनी रसिकान्तःकरणीं
हळू शिरावें चोरोनी,

अशी मनीषा त्यांनी बाळगली. रसिकान्तःकरणांत ते शिरले पण चोरून नव्हे तर धक्का मारून असा प्रा. जोग यांचा अभिप्राय आहे तर 'दिव्यतेजविभवाभनवाली' 'भूभृतकटकावृतवनखंडी' यासारखे लांब लांब समास पाहिल्यानंतर त्यांच्या काव्याला 'रठ्ठ चर्म गाठांनी भरलें' असें त्यांच्याच शब्दांत म्हणण्याचा मोह आचार्य अत्र्यांना आवरतां आला नाही. 'गीर्वाण प्रचुरा रचना ती केव्हांही हीन' असें सांगून 'शुद्ध मराठी धाटींचा' पुरस्कार करणाऱ्या Bee ची कविता मात्र संस्कृतप्रचुर शब्दांनी क्लिष्ट व दुर्बोध झाली आहे असा त्यांच्यावर नेहमीच आक्षेप घेतला जातो. याचें मूळ जसें त्यांच्या संस्कृतच्या अध्ययनांत आहे तसेंच तें जें व्यक्त करावयाचें तें सुस्पष्ट व रेखीव असलें पाहिजे या त्यांच्या हव्यासांतहि आहे. 'अपार्थिव संगूढ भावां'ना Bee नी इतक्या कुशलतेने शब्दनिविष्ट केलें आहे की खरोखरच त्यांतील एक शब्दहि बदलतां येणें शक्य नाही. दूर कशाला—

भूभृतकटकावृतवनखंडी;
कटु वाग्जल्पनतांडव मांडी,
प्रतिध्वनिप्रति परिसुनि सांडी,
निज भानाला, एकदा निखालस बोला

यांतील प्रत्युत्तराची कणखर भावना व्यक्त करावयास यापेक्षा कोणते शब्द अधिक अर्थवाहक झाले असते? त्यांच्या काव्यांत शब्द आणि अर्थ यांचें 'साहित्य' परमरमणीय आहे. "भाषासौष्ठवाबाबद Bee हे अर्वाचीन 'मुक्तेश्वर' होत" हें श्री. वा. ना. देशपांडे यांचें विधान त्यांच्या या वैशिष्ट्याची यथार्थ कल्पना देणारें आहे. वर्णनें व्यक्तींचीं असोत किंवा सृष्टिसौन्दर्याचीं असोत, त्यांचें साक्षात् दर्शन Bee आपल्या मनःश्चक्षूंना घडवितात.

उलट केशवसुतांची काव्यप्रेरणा ही जुन्या संस्कृत किंवा संतवाङ्मयांतून घेतलेली नाही. रघुवंशांतील कांही श्लोकांचें त्यांनी केलेलें भाषान्तर किंवा संस्कृत धर्तीवर लिहिलेलीं कांही थोडीं काव्यें त्यांच्या संस्कृतच्या अभ्यासाच्या रेंगाळणाऱ्या खुणा म्हणून सोडून दिल्या तर इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनाचा पगडा त्यांच्यावर अधिक बसला. 'जायाचें जग का असेंच,' 'वैर तयाला' यासारखीं इंग्रजी धर्तीचीं वाक्यें किंवा 'अन्धार—जो फ़लक होत असे अम्हास । चेतोनिबद्धजनाचित्र लिहावयास' यासारख्या इंग्रजीमधून घेतलेल्या कल्पनांची पखरण ही त्यांच्यावर इंग्रजीच्या झालेल्या परिणामाचीं उत्कृष्ट उदाहरणें होत. वर्डस्वर्थच्या भाषेच्या साधेपणाच्या आग्रहाचा पगडा केशवसुतांवर इतका बसला की, साधे शब्द निवडतांना त्यांनी लालित्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलें. 'आलें लोचनांतुनी तोय कितिकदां' यासारखे रसभंग करणारे शब्द त्यांच्या काव्यांत आले आहेत. दृष्टिगोचर अशा बाह्यगुणापेक्षा त्यांचें लक्ष बुद्धिगम्य अशा आंतरगुणाकडेच अधिक असल्याने तपशीलाचा भाग त्यांच्या सौन्दर्यवर्णनांत एकन्दर कमीच आला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Bee चीं हीं दोन वैशिष्ट्यें केशवसुतांच्या तुलनेने मनांत अधिक ठसत असलीं तरी बदलत्या युगांतील आकांक्षांचें यथार्थ प्रकटीकरण करण्यास निरनिराळे रचनाप्रयोग करून रचनासौकर्य मिळविणाऱ्या केशवसुतांची बंडखोर वृत्तिहि तितकीच श्रेष्ठ आहे. अक्षरगणवृत्तें सोडून त्यांनी मात्रावृत्तांचा अंगीकार केला. इंग्रजी पद्धतीची निराळी यमकरचना केली. सुनीतरचनेचा प्रघात त्यांनीच मराठींत आणला. किंबहुना आजच्या कविप्रिय मुक्तछंदाचें मूळहि त्यांच्या रचनापद्धतींत सांपडणें अशक्य नाही. तर 'भावाविष्करणाच्या नूतन धाटीं'चें कौतुक करणाऱ्या Bee नी मात्र शार्दूलविक्रीडित हें संस्कृत वृत्त व साकी, दिंडी हीं जुनीं मराठी वृत्तें या रूढ चाकोरीबाहेर आमत्या कवितेला पदन्यास करूं दिला नाही. जें व्यक्त करावयाचें तें ह्या जुन्या वृत्तांतून व्यक्त करतांना त्यांना कोठेहि श्रम पडले नाहीत, रचना कृत्रिम झाली नाही, निरर्थक पादपूरकांची, संबोधनांची खैरात करावी लागली नाही हें खरें असलें तरी आधुनिक मराठी काव्याच्या बहिरंगाशी Bee चा हा संकुचितपणा विसंगत आहे यांत शंका नाही.

अतिशय घोटींव व टाकाठेकीच्या रचनेने Bee ची कविता वाचतांना जसा कलापूर्तीचा बुद्धिगम्य आनन्द मिळतो तसाच त्यांतून निघणारे आशावादाचे सूरहि आपल्या भावनेला मोहिनी घालतात. केशवसुतांच्या काव्यांत जें नैराश्य तळमळ आहे तिचा Bee च्या कवितेंत संपूर्ण अभाव आहे. या भिन्नवृत्तींमुळेच 'भागीदार कृतींत मानव असे कालानिसर्गासवें' असें Bee म्हणतात तर 'निसर्ग निर्घृण त्याला मुरवत नाही अगदी पहा कशाची' व म्हणून 'त्याशीं भिडुनी झटुनी झगडत उठवा अपुले उंच मनोरे" असें केशवसुत सांगतात.

Bee व केशवसुत यामध्ये आपाततः दिसणारा हा विरोध ठळक व स्पष्ट आहे. खरी मौज आहे ती त्यांच्या अंतरंगांतील साम्यस्थळें निरखण्यांत! जुन्या कवितेपासून अन्तर्बाह्य निराळी कविता केशवसुतांनी जाणीवपूर्वक लिहिली व या घटनेचें समर्थन करण्यासाठी त्यांनी आपले काव्यविषयक विचार प्रकट केले. प्रौढ काव्यरचनेस मराठी भाषा अशिष्ट मानणाऱ्या पंडितांची कदर न बाळगता 'अमृतातेंहि पैजा' जिंकण्याचा वेडा संकल्प मराठीकडून पार पाडविणाऱ्या 'बऱ्या बंडवाल्या' ज्ञानेश्वरांचा मागोवा घेत Bee गेले आहेत. आधुनिक मराठी कवितेच्या अपेक्षा त्यांनी नेमक्या हेरल्या होत्या. 'प्राज्ञवर पंडितां'ना न जुमानतां त्या ह्यांनी ग्रथितहि केल्या आहेत. आणि विशेष हें की बहिरंगाच्या दृष्टीने परस्परांना विरोधी वाटणाऱ्या कवींचें अंतरंग मात्र परस्परांशी अगदी जुळतें आहे.

नवकाव्याची अवहेलना करणाऱ्या, शब्दार्थाचे डोंबारी खेळ म्हणजे काव्य, भव्य नीतिपाठ व थाटदार रचना म्हणजे काव्य असें समजणाऱ्या 'कर्कशशुष्क तर्कनिपुण प्राज्ञवर पंडितांना 'जुनीं मापकोष्टकें जराशीं बाजुस सारा तीं' अशी विनवणी Bee नी केली आहे. आधुनिक मराठी कविता स्वतःचें 'प्रसाधनशासन' निर्मिण्यास समर्थ आहे असा त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी संस्कृतभाषा-नियमांची चाललेली ही बळजोरी बंद करा कारण "'रांगड' अथवा 'नागर' हें तरि ठरवावें कोणी ?" असा स्पष्ट सवाल केला आहे. तो केशवसुतांच्या—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशी असावी कविता फिरून। तशी नसावी कविता म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला ?। आहांत मोठे पुसतो तुम्हाला ? ”

याशीं किती जुळतो आहे तें पाहण्यासारखें आहे.

विद्वत्ता आणि निवृत्ति यांच्या कैचींत सापडलेल्या प्राचीन काव्याला भोंवतालच्या जीवनांत काव्यविषयाचा आढळच झाला नाही. उलट आधुनिक कवितेला साध्याहि विषयांत मोठा आशय आढळूं लागला. ‘ जें रम्य ’ बघून कवींना वेड लागूं लागलें तें काव्याचा विषय होऊं लागलें. सौन्दर्य हा काव्याचा प्रमुख विषय झाला. Bee नीहि ‘ जिन्हार हेंच स्वानंदाचें—सौन्दर्याचि काव्य ’ अशीच काव्याची व्याख्या केली आहे.

जीवनांतील लहानसहान गोष्टींतील आनन्द लुटण्याची वृत्ति ही निष्पाप बालकाची मिरास आहे. संसाराच्या दडपणाखाली पिचलेल्या प्रौढाला त्यांतील सौन्दर्य कसें आकलन होणार ? म्हणून या निरागस आनन्दाचा आस्वाद घेण्यासाठी केशवसुत म्हणतात ‘ मज वय विसरूं दे ’ तर नवतेजाचा साज करून लकाकणाऱ्या चांदणीच्या दिव्य तेजाशी मिसळून जाऊन प्रज्ञाधनांना प्राप्त न झालेल्या भावमय जगाशी तन्मय होण्यासाठी Bee म्हणतात “ प्रौढपण मज निज विसरुं दे ”

स्फूर्ति स्फूर्ति म्हणून आपण जिला म्हणतों तींत १० टक्के निसर्गदत्त देणगीचे असले तर ९० टक्के निढळाच्या घामाचे असतात असें अलीकडील मानसशास्त्रवेत्ते म्हणूं लागलें असले तरी जी प्रतिभा “नैसर्गिकचि” असल्याचा निर्वाळा संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी दिला किंवा ‘काय म्यां पामरें बोलावी उत्तरें ! परि त्या विश्वंभरें बोलविलें’ असें म्हणून आपल्या काव्यकर्तृत्वाचें श्रेय ईश्वराकडे देण्याचा प्रघात संतकवींनी पाडला त्याला आधुनिक कवि अपवाद राहिले नाहीत. ‘शारदेने जो मंत्र दिला कानीं—तसें लिहिलें मीं’ असें सांगून केशवसुत दैवी शक्तीचा प्रभाव वर्णितात तर ही ‘सौन्दर्यस्फुरणा’ म्हणजे ‘नैसर्गिक शक्ति आहे’ ‘देवि शारदा हीच—न हें स्थळ अभ्यासा साध्य’ असें Bee सांगतात.

ईश्वरानुग्रहाने मातबर झालेल्या या कवीचें सामर्थ्य सामान्य जनापेक्षा अधिक असणारच. धोंड्यामधून पाहूं शकणाऱ्या कवींची दृष्टि वर्तमानकालापुढे भविष्यकालांतहि झेपावत असल्यास नवल तें काय ? कवि हा द्रष्टा असतो. भविष्यकाळाचा त्याला साक्षात्कार होत असतो.

जगांतील महाक्रान्तिचें तें भविष्य सांगाया
तुम्ही येतसां लावीतसांहि तें लोकां गाया

असा कवींचा महिमा केशवसुत वर्णितात तर—

काव्य अगोदर झालें नन्तर झालें जग सुंदर
रामायण आधी, मग झाला राम जानकीवर

असें म्हणून Bee दुजोरा देतात.

आणि अशा काव्याचें मूळ अधिष्ठान व त्याचा प्रभाव जो कवि त्याचें सामर्थ्य व थोरवी दोघांनीहि वर्णिली आहे. कवीच्या प्रभावाने ‘शून्यें बसूं लागतीं’ असें Bee म्हणतात तर ‘शून्यामाजि वसाहती वसाविल्या कोणी सुरांच्या बरें !’ असें केशवसुत विचारतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

काव्य म्हणजे शद्वालंकाराचा साज चढविलेली निर्जीव वस्तु नाही. कवीच्या उत्कट व्यक्तिगत प्रतीतीचा प्राण तींत ओतला तर हीच 'पद्यपंक्तिची तरफ' जग उलटून टाकण्यास समर्थ ठरते ही काव्याच्या सामर्थ्याची यथार्थ जाणीव केशवसुतांना होती. व म्हणूनच ज्या रूढीच्या कोषांत गुरफटून जाऊन आपण आपल्या व्यक्तित्वाचा विकास खुरटवून टाकला तो कोष फोडण्यासाठी त्यांनी जें बंड केलें त्याचें प्रतीक म्हणजे त्यांची 'तुतारी' होय. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वत्रयीचा त्यांनी मोठ्या घडाडीने पुरस्कार केला. धर्माचें अवडंबर माजवून खऱ्या जीवनमूल्यांचा लोकांना विसार पाडणाऱ्या स्वार्थी स्थितिनिष्ठांची त्यांना मनस्वी चीड होती. घातक प्रतिबंधावर हल्ला करून 'उन्नतिचा ध्वज' उंच धरून पुढे सरण्याचा त्यांनी आदेश दिला. जुनें तें सुंदर सोज्वल व नवें तें खोटें म्हणणाऱ्या मूर्खांचा त्यांनी धिक्कार केला. जुन्यांतून होणारी नवी निष्पत्ति त्यांना श्रेयस्कर वाटत होती. आणि हें जेथे शक्य नसेल तेथे 'जुने जाऊं द्या मरणालागुनि' हा संदेश त्यांच्या, तुतारीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोचविला.

'ऐश्वर्यात्मक सामर्थ्य निर्माण करण्याची शक्ति ज्या सौन्दर्यांत आहे तेंच खरें काव्य' ही काव्याविषयीची अदात्त भावना Bee समोर असल्याने—

> भूताधारें समजुनि चालू काळ नीट निर्मितो
> सोज्वळ भविष्यकाळाला कवि काय नव्हे तो ?

हें कवीचें सामर्थ्य त्यांना जाणवलें. भूतकाळाचे गोडवे गाऊन कोणी भविष्यकाळावर आधिराज्य गाजवूं शकत नाही, तें केवळ आत्मवंचन आहे हें त्यांनी जाणलें. 'आर्यांची परंपरा' 'संस्कृति' ह्यासारख्या शद्वावडंबराखाली समाजदेहांत अनिरुद्ध संचार करीत असलेल्या आचारविचारौघाला बांध पडला, राष्ट्रात्मा पंगु आणि पोकळ बनला त्यावेळीं Bee नी ज्ञानेश्वरांसारख्या वड्या बंडवाल्याचे 'साथी' होण्यांत अभिमान बाळगला. निसर्गाचा 'वाढा आणि जगा' हा आदेश ओळखला आणि प्रगतिपथावर पाऊल ठेवावयाचें असेल तर 'प्राक्कालाची प्रगतिपरता' तेवढी घेऊन 'कलेवर जुनें टाका' असा आदेश दिला तो केशवसुतांच्या 'तुतारी'चा पडसाद नाहीच' असें कसें म्हणावें ?

केशवसुतांच्या तुतारीसंप्रदायांत झालेला कवींचा समावेश पाहून आता व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' ह्या म्हणीऐवजी 'केशवसुतोच्छिष्टं जगत् सर्वम्' असें म्हणण्याची पाळी आली की काय हा विचार टीकाकारांस अस्वस्थ करूं लागला. पण ज्या व्यापक स्वातंत्र्याच्या कल्पनेंतून केशवसुतांची कविता स्फुरली त्याच आकांक्षापूर्तीचीं स्वप्नें Bee पाहत होते. अशावेळीं केशवसुतांनी केलेल्या वैचारिक क्रांतिपासून Bee कवींना सर्वथा दूर राहणें अशक्य होतें. विशेषतः वरील साम्यस्थळें पाहिलीं की केशवसुतांच्या काव्याचा त्यांच्यावर सुतराम्‌देखील परिणाम झाला नाही या अभिप्रायाच्या सत्यतेबद्दल मन साशंक होतें. Bee कवींच्या कवितेचें बाह्यांग वेगळें असेल पण तिच्या अंतरंगावर मात्र केशवसुतांच्या काव्याची पुष्कळच छाप पडली आहे हें निःसंशय ।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समीक्षा

अश्राप भावसौंदर्याने विनटलेलें—"भक्ति भाग्य"

दर्यापूरचे सुप्रसिद्ध दिवंगत कवि डॉ. का. रा. धर्माधिकारी यांचा विदर्भ साहित्य संघ-पुरस्कृत "भक्ति-भाग्य" हा समग्र काव्यसंग्रह, अकोला येथील गेल्या वि. सा. संम्मेलनांत प्रकाशित झाला. संग्रहाला वि. सा. संघाच्या विद्यमान अध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांचा पुरस्कार, आचार्य धर्माधिकारी यांची 'भूमिका' व प्रा. श्री. ना. बनहट्टी यांची विवेचनात्मक मौलिक प्रस्तावना लाभलेली आहे. ही काव्य रचना 'आपुलिया सुखस्वार्था' व 'भव बन्धातून मुक्त होण्याकरितां' झाली असल्याचें त्यांच्या पुत्रत्रयांनी नमूद केलें आहे आणि त्यांत ओतप्रोत भरलेला भक्तिरस पाहतां ही काव्यनिर्मिती 'शिवेतरक्षतये' च झाली असावी असें वाटतें.

अण्णासाहेबांच्या भक्तिमय सश्रद्ध अन्तःकरणाला प्राचीन संत कवींची परंपराच अनुसरणें योग्य होतें. या संग्रहांत सर्वदूर पसरलेला अवीट भक्तीचा भावगन्ध त्याच प्रतिभाशाली संत कवींचें पावन स्मरण करून देतो. नव्या मराठी काव्याच्या उषःकालांत अण्णासाहेबांनी काव्यरचना करण्यास सुरवात केली. काव्याच्या नवथर स्वरूपाबद्दल त्यावेळी त्यांना कांहींसें अकर्षण असलें, तरी अभिजात ओढ मात्र भक्तिमार्गाकडेच होती. भक्तवत्सल प्रेममय प्रभु व्यक्तीमात्रांस सुलभतेने हमखास मिळवून देणारा नि प्राचीन सन्त कवींनी मनःपूत चोखाळलेला हा भक्तिमार्ग! याने अण्णासाहेबांच्या अन्तःकरणातील सहृदयतेला आकृष्ट केलें असल्यास नवल काय या संग्रहातील प्रत्येक पद्य निरपवादपणे भक्तिरसाने ओथंबलेलें दिसतें, याचें कारण हेंच. यांत केलेल्या भावाविष्कारातील गोडवा कांही और आहे.

यात सुरवातीला कांही स्फुट पदें दिलेलीं आहेत. आत्मोद्धाराकरिता कवीने भगवंताजवळ केलेली कळकळीची विज्ञप्ति, हा यातील बहुतेक पद्यांचा प्रधान विषय आहे. यातील पहिल्याच पदांत कवीने 'वंदामुकुंदाऽरविंदानना गोपवृंदासवें खेळि वृंदावनीं जो,' असा सहज सुंदर मधुमधुर अनुप्रास साधला आहे. कवीमध्ये कवित्वशक्ति किती प्रमाणांत होती, हें दर्शवण्याकरिता नमुन्यादाखल एक उदाहरण पुढे करतों—

> रम्य उषा गगनांगणीं। कुंकुमरुचि दे पसरुनि
> पद्म-कोष बन्धातुनि। सुटति भृंग-माला

यातील अर्थगौरव आल्हाददायक आहे. कवीने ईशभक्तिपरच पद्यें रचलीं नाहीत. ईशभक्तिइतकीच त्यांची राष्ट्रभक्तिहि भीष्म आहे. लोकमान्यनिर्वाणाने झालेल्या शोकातिरेकातून उत्स्फूर्त झालेला आर्यभूविलाप आणि मातृभूमिवंदन यांत कवीचा ज्वलन्तोत्कट राष्ट्राभिमान पूर्णांशाने अभिव्यक्त झाला आहे. त्यांचें मातृ-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भूमिवंदन तर मातृभूविषयीच्या भावघनतेचें पुरेपूर द्योतक आहे. 'तुजाविण भुवनत्रयांत । न दिसे प्रिय वस्तुजात' अशी त्यांची तिजविषयी अचल निष्ठा आहे. 'दडपशाहिची आग भडकली' असतांना, अन्याय नि अत्याचार यांच्या ऐन क्रूर, रौद्र, भीषण तांडवांत त्यांना गीतेतल्या भगवंताच्या 'संभवामि युगे युगे' या आभिवचनाची तेवढी आशा उरली आहे. म्हणून 'पाहुनि तुज संकटगत । श्री मुकुंद विमलचरित । युगें युगें अवतार धरित । विपद्-वारणीं' या शब्दांत ते, परवशतेमुळे हैराण झालेल्या मातृभूचें सांत्वन करितात.

त्यानंतर त्यांनी रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं आहेत. हीं सर्व आख्यानें नितान्त रसाळ आहेत. प्रसंगानुकूल रसनिष्पत्ति नि रसानुकूल शब्दयोजना करण्यांत अण्णासाहेबांचा हातखंडा आहे. यातील सखूचा व द्रौपदीचा धावा व जयद्रथाख्यानातील सुभद्रेचें शोकगीत वाचून अन्तःकरण विचलित होतें. 'भीष्म-प्रतिज्ञे'तील द्रौपदी भीष्माच्या कठोर प्रतिज्ञेपासून आपल्या पतिदेवांचें रक्षण करण्याबाबत श्रीकृष्णाला विनविते—

परि एक राहिलें घेणें
मज कुंकुम मंगल लेणें
शेवटचें देणें देणें
त्यावीण सर्व हीं देणीं । जणुं प्रेतावरचीं लेणीं

यांत द्रौपदीची सोज्वळ पतिनिष्ठा, भाविकता व तळमळ अतीव यशस्वीरीत्या व्यक्त झाली आहे.

द्रौपदी वस्त्रहरणामध्ये मदोन्मत्त दुर्योधनाने भरसभेंत आपल्या उघड्या मांडीवर बसण्याकरिता द्रौपदीला बेशरम आवाहन केल्यानंतर चवताळलेल्या द्रौपदीने दिलेलें तेजस्वी उत्तर, मालारूपक अलंकाराचें एक अप्रतिम उदाहरण आहे. जयद्रथवधाख्यानांत योगेश्वर श्रीकृष्णाचें पार्थाविषयीचें अनन्य सौहार्द नि भक्त-वात्सल्य यांचा प्रकर्ष झालेला दृष्टीस पडतो. यांत एक स्वकृत हिन्दी पद घातलें आहे. या दोन्ही आख्यानांत कीर्तनप्रसंगी अभिनयास भरपूर वाव देणारीं पद्यें घातलीं आहेत. "वदे शकुनि-'हुं, टाक जिंकिलें मी!'" "घे घे आटप शीघ्र, काय बघसी–हा सूर्य हा सैंधव!" अशा कृतिशील काव्यपंक्तींमुळे कीर्तन अधिकच परिणामकारक होतें. सिंहगडाख्यानांत स्वा. सावरकरांच्या ओजस्वी पोवाड्याचा योग्य उपयोग केला आहे. चिलयाबाळमध्ये तर करुणरसाचा परमोत्कर्ष दृष्टीस पडतो. हें सर्व कथाकाव्य आर्याबद्ध आहे. वाचतांना पदोपदीं मोरोपंतांची आठवण व्हावी, इतकें तें सरस उतरलें आहे. यांत कवीच्या अंतःकरणाची उत्कटता प्रगाढ असल्या-मुळे कथेला अवीट मधुरिमा प्राप्त झाला आहे.

यानंतर अण्णासाहेबांनी संस्कृतातून केलेलीं रूपांतरें दिलेलीं आहेत. सर्वप्रथम जगन्नाथ पंडिताच्या 'गंगालहरी'चें समवृत्त समश्लोकी रूपांतर आपल्या नजरेंत भरतें. पंडितांच्या लहरींतली रसवत्ता, कल्पनाविलास व पांडित्य हे सर्व गुण यांत सर्वांशानें उतरले आहेत. पुढे पंडितांच्या गंगालहरीतला श्लोकार्ध व अण्णासाहेबांचें रूपांतर दिलेलें आहे. त्यावरून त्यांचें रूपांतरपाटव अजमावतां येईल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ललाटे या लोकैरिह खलु सलीलं तिलकिता ।
विलुंपन्ती सद्यो विधिलिखितदुर्वर्णसरणिम् ॥ (गंगालहरी ४२. जगन्नाथकवि)

जनांनी लीलेने सहज निजभाली तिलकिता
हरी जो अज्ञाना घनतम जसा चंडसविता ।
क्षणामाजी सारें विधिलिखित दुर्लेख मिटवी
तुझ्या त्या पंकाने मम सकल शोकांस शमवी ॥ ४२. (रूपांतर-धर्माधिकारी)

या दोन्ही श्लोकांशी मोरोपंतांच्या गंगास्तवातील 'राहेना त्वन्मृद्कीं, विधिलिखित असे योग जो तो, कपाळीं' या कल्पनेचें विलक्षण साम्य मनात ठसतें. यानंतरचीं कुमारसंभव, किरातार्जुनीय वगैरेतील कांही सर्गांचीं रुपांतरेंहि बव्हंशी यशस्वी उतरलीं आहेत. सुभाषितांचे अनुवाद मात्र मूळाइतकेच सरस आहेत. पुढील सुभाषित स्वतः कवीचें असल्यास तें किती बहारदार आहे, याची खात्री रसिक मनाला पटेल.

एकोऽहि दोषो गुणसंनिपाते
निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः । (कुमारसंभव—कालिदास)

—पटे मनाला न कवीन्द्रवाणी
दारिद्र्य दोषें गुणकोटि हानी ॥

यानंतर कवीची संस्कृत काव्यरचना दिलेली असून त्यापैकी 'श्रीतापष्टकम्' सुंदर आहे. यांत कवीच्या गीर्वाण प्रभुत्वाचा प्रत्यय येतो.

हें अण्णासाहेबांच्या बहुविध काव्यसंपदेचें विहंगमावलोकन झालें. त्यांची वाणी अत्यंत प्रसन्न आहे. साधें अनायासे साधलेलें श्रुतिमनोहर पदलालित्य, शारदीय सुषमेप्रमाणे मनाला आल्हाद देणारा नि सुलभ अर्थव्यक्ति करणारा प्रसाद, मंदाकिनीच्या स्फटिकतुल्य अगाध प्रवाहाप्रमाणे सखोल अर्थगांभीर्य, आणि रसिकचित्त आकृष्ट करणारे सुभग अलंकार—हीं अण्णासाहेबांच्या काव्याचीं विलोभनीय वैशिष्ट्यें आहेत. त्यांची काव्यरचना प्रौढ, भरदार व पुष्ट आहे. कल्पनेची ऋजुता, विशुद्ध सौंदर्यप्रतीति व सुबोधार्थ प्रीति हें त्यांच्या काव्यांतून व्यक्त झालेले गुण म्हणजे साक्षात् कविमनाचा प्रकट आविष्कारच होय!

कल्पकता व भावनोत्कटता हे कोणत्याहि काव्याचे प्रमुख निकष मानण्यात येतात. या कसोटीला प्रस्तुत काव्य उतरतें, हें वरील समालोचनावरून दिसून येईल. विविध पण वेंचक नि चेतोहर अलंकारांनी अण्णासाहेबांनी आपली कविताकामिनी नटविली आहे. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, विरोधाभास, स्वभावोक्ति इत्यादि मोजक्याच ठळक व ठसठशीत अलंकारांचा वापर त्यांनी केला आहे. आणि तो नीटनेटका आहे.

'संत सखुबाई' मधील कांही आर्यांमध्ये सुंदर श्लेष व 'चिलया बाळ' मधील शोकपर आर्यांमध्ये समर्पक दृष्टान्त वापरले आहेत. 'पारधी कथे'तील अरण्यामध्ये ऊर्ध्वहस्त करून उग्र तपस्या करणाऱ्या 'अतिशुष्क' मुनीला दिलेली ही मनोरम उत्प्रेक्षा—

भासे जसा गलितपर्ण, विशाल, शुष्क
शाखा उभारुनि उभा गगनीं अशोक

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि ' भीष्मप्रतिज्ञे ' तलीं शोकातिरेकाने जमिनीवर धाडकन् आदळलेल्या द्रौपदीला दिलेली ' पडली मारुत-हृत कदलीसम भूवरि उन्मळुनी ।' ही उपमा तर केवळ अनुपम आहे. अन्योन्याचीहि कांही उदाहरणें आहेत. या सर्व अलंकारांचीं कांही उत्कृष्ट उदाहरणें उद्धृत करण्याचा मोह होतो. पण विस्तारभयास्तव तो आवरतां घेतों. बाकीचीं नमुनेदार उदाहरणें वरती यथास्थल आलेलींच आहेत.

इतर कोणत्याहि सन्तकवींपेक्षा कवीवर पन्तकवींचीच अधिक छाप पडलेली दिसते. त्यांचें गीर्वाणप्राचुर्य, विशेषतः ' निज-पद-नत-जन-कलिमलहरणा,' ' मन्मानसाब्धिचंद्रा,' ' ममहृच्चकोरचंद्रा या ! ' हीं संबोधनें उघड उघड मोरोपन्तांचें ऋण मान्य करतांना दिसतात.

कोणतीहि कलाकृति निरामय वा निर्दोष नसावीच, असा विधिसंकेतच आहे कीं काय कुणास ठाउक ! कोणत्याहि दोषैकदृक् माणसाला तर यांत कांही उणीवा आढळल्याशिवाय राहणारच नाहीत. पण अण्णासाहेबांच्या काव्याचा एक चाहता या नात्याने मी किंचित दोषदिग्दर्शन करणें फारसें वावगें ठरणार नाहींसें वाटतें. यातील सर्वांत मोठा व डोळ्यांत सलण्याजोगा दोष म्हणजे पुनरुक्ति. व्याधाख्यान हें जवळ जवळ संपूर्णच पारधीकथेतलें आहे. चिलयाख्यानांतहि 'चिलयाबाळ' मधील बऱ्याच आर्यांचा सढळ वापर केलेला आहे. 'स्फुट पदें' मधील [illegible], २९ व ४७ हीं पदें अनुक्रमें संत सखुबाई व सिंहगडाख्यानांत पुनरुक्त झालीं आहेत. जयद्रथ वधाख्यानातील सुभद्रेच्या शोकगीताचें व स्फुट पदातील 'आर्यभू विलापा'चें तिसरें कडवें तर अेकच आहे ! पण 'कवयः निरंकुशाः' हें जाणून या दोषांकडे डोळेझांक करणेंच अिष्ट असतें.

साहित्य सोनीयाची खाण

आपली 'सारस्वती जन्मभू' ही 'अमृतातें पैजा' जिंकणाऱ्या मराठी भाषेतील 'साहित्य सोनियाची खाण' आहे. सध्याच्या नवकाव्याच्या नवयुगांत, याच क्षेत्रातील पूर्वीच्या भक्तिपर वाङ्मयाच्या वैभवसंपन्न कालखंडाचें स्मरण करून देणारा हा काव्यसंग्रह, भक्तिरसासाठी आसुसलेल्या सश्रद्ध रसिकांच्या अंतःकरणाची निश्चित तृष्णा भागवील. Poetry is at bottom a criticism of life (काव्य ही जीवनावरची संसृति-टीका.) ही मॅथ्यु अर्नोल्डची व्याख्या अशा भक्तिपर काव्यास लागू पडते. अण्णासाहेबांच्या हयातींतच प्रसिद्ध होऊं घातलेलें हें पुस्तक त्यांच्या निधनानंतर तीन वर्षांनी प्रकाशित करण्याचा योग आला असला, तरी प्राचीन वैदर्भीय कविश्रेष्ठ उत्तमश्लोक यांच्या पुढील ओवींत सांगितल्याप्रमाणे आज भाविक रसिकांची ' दैवरेखा उदेली ' असेंच म्हणावें लागेल.

काय दैवरेखा उदेली । पूर्वज सुकृतें परिणमलीं
वाग्वल्ली अमृतफळीं फळली । कीं वोडवली हे रचना
(गाथा सप्तशति)

—राम शेवाळकर.

भक्ति-भाग्यः—समग्र काव्य संग्रह कविः—डॉ. का. रा. धर्माधिकारी विदर्भ. साहित्य संघ पुरस्कृत. प्रकाशकः—वा. का. धर्माधिकारी, दर्यापूर. मूल्य ४ रुपये

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(२) स्थानपोथी

१. मथुरा, वृंदावना सारखीं ठिकाणें जशीं कृष्णभक्तांना वंदनीय, पंढरी, आळंदी इत्यादि स्थानें जशीं वारकरी पंथांतील लोकांना पूज्य, सज्जनगड (परळी), जांब वगैरे स्थानें जशीं रामदासपंथीयांना माननीय, तशीं प्रस्तुत 'स्थानपोथींत' वर्णिलेलीं स्थानें महानुभावांना तीर्थाप्रमाणे प्रातःस्मरणीय आहेत.

'स्थानपोथी' मध्ये महानुभावपंथाचे आद्यप्रणेते श्रीचक्रधरस्वामी, त्यांचे गुरु रिधपूरचे श्री गोविंदप्रभूंचे गुरु श्री चांगदेव राऊळ यांचीं स्थानें साधारणतः येतात. फलटण, मातापूर, द्वारका इत्यादि श्री चांगदेवासंबंधींचीं स्थानें अगदी प्रारंभी थोडक्यांत सांगितलीं जातात; त्यानंतर श्रीचक्रधर विषयक स्थानें व पुढे श्रीगोविंद-प्रभूंचीं स्थानें दिलीं जातात. प्रस्तुत मुद्रित पुस्तकांत श्रीचक्रधरचरणांकित स्थानेंच छापलेलीं आहेत. 'रिधपूर'चीं स्थानें स्वतंत्र भागांत पुढे प्रकाशित करण्याचा डॉ. कोलते यांचा संकल्प आहे. श्री चांगदेव यांचीं स्थानें परिशिष्टांत दिलीं आहेत.

वरील 'स्थानपोथी' चें प्रकाशन 'महानुभाव वाङ्मयाच्या' दृष्टीने महत्त्वाचें आहे ..षु संशय नाही; तसेंच प्राचीन महाराष्ट्राच्या 'भूगोल विषयक संशोधनास' या पु..काने चांगलें मार्गदर्शन होण्याचा बराचसा संभव असल्याने महानुभावेतरांना देखील हें पुस्तक महत्त्वाचें वाटेल, म्हणून प्रस्तुत 'स्थानपोथी' प्रकाशित केल्यामुळे डॉ. कोलते हे अभिनंदनास पात्र आहेत.

२. श्रीचक्रधरस्वामी यांची कर्मभूमि 'महाराष्ट्रदेश' असल्यामुळे, आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारार्थ अखंड परिभ्रमण करून 'मऱ्हाठी' भाषेच्या द्वारे 'ब्रह्मविद्ये-चा सुकाळ' महाराष्ट्रजनतेच्या सर्व दर्जाच्या लोकांत त्यांनी केला. झाडीमंडळ, नागपूर, वऱ्हाड, खानदेश, आणि गोदावरीगंगेच्या उभयतटांवरील परिसरांतील नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, बीड इत्यादि महाराष्ट्रांतील भागांत त्यांच्या संचाराचा व्याप होता; त्यामुळे 'स्थानपोथी' मध्ये आलेलीं गांवें म्हणजे प्राचीन महाराष्ट्राचें स्थूलमानाने झालेलें भौगोलिक दर्शनच होय, असें म्हटलें तरी चालेल. स्थानपोथींत केवळ गांवांचाच निर्देश नसून त्..[?] त्या ठिकाणची कांही सूक्ष्म माहितीहि दिली असल्याने, संशोधनास योग्य विषय होण्या इतकी तिची [1] महती आहे.

३. डॉ. य. खु. देशपांडे यांच्या 'महानुभावीय मराठी वाङ्मयांत' 'स्थानपोथी'ची अल्पशी माहिती, पानें ४०–४१ यांमध्ये आली आहे; पण 'ऋद्धपुर वर्णन' काव्याची प्रस्तावना व 'ऋद्धपुर' विषयक परिशिष्टांत दिलेले 'स्थानपोथी'-तील विस्तृत उतारे यांवरून, स्थानपोथीचें स्वरूप वाचकांना अधिक स्पष्टपणे कळण्याजोगें आहे; तसेंच 'शारदाश्रम वार्षिकांत' श्रीचक्रपाणी चरित्राच्या प्रस्ताव-नेंत 'फलटण' ची माहिती देणारें विस्तृत 'अवतरण' आलें आहे, तेंहि मननीय आहे. 'लीळाचरित्रा'च्या अभ्यासकांना तर 'स्थानपोथी'ची विशेष आवश्यकता

---

१ म. म. दत्तोवामन पोतदार यांच्या साठाव्या वर्षानिमित्त प्रसिद्ध झालेल्या स्मारक ग्रंथांत, 'स्थानपोथी' या विषयावर, मराठी लेखांच्या भागांत, पृष्ठें २१-२८ मध्ये, श्री. ह. ना. नेनें यांचा निबंध वाचकांनी पाहावा.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटणारी आहे. तथापि 'स्थानपोथी' ची महती नागपूरच्या जनतेच्या नजरेंत भरण्यासारखे दोन प्रसंग, 'मध्यप्रांत संशोधक मंडळाच्या वार्षिक दिन प्रसंगीं घडलेले आहेत. प्रि. नानासाहेब मिराशी यांनी 'रामटेक येथील रामदेवराय यादवाच्या काळचा [1] शिलालेख हा आपला महत्त्वाचा निबंध वाचला, त्यावेळीं 'स्थानपोथी मधील 'रामटेक' विषयक अवतरण व 'स्थानपोथी' विषयीं माहिती करून देणारें लहानसें टिपण श्री. ह. ना. नेने यांनी वाचलें होतें. (स्थानपोथी, भोगरामीचीं स्थानें, पानें ४-५ पाहा.) त्या प्रसंगी शिलालेखाचे छाप व 'स्थानपोथी' या वस्तू प्रेक्षकांना पाहण्यासाठी सभागृहांत ठेवल्या होत्या. वरील कोरींवलेल्यांत उल्लेखिलेलीं कांही तीर्थें व देवालयें सांप्रतकाळीं नष्ट झालेलीं असलीं तरी त्यांचा उल्लेख महानुभावांच्या 'स्थानपोथींत' आढळतो, व म्हणून 'स्थानपोथी' ही वरील शिलालेखास उपोद्‌बलक आहे हें निश्चित ठरलें; हा झाला पहिला प्रसंग. दुसऱ्या एका वार्षिकोत्सवांत 'लोणारचीं स्थानें [1]' यावर श्री. नेने यांनी निबंध वाचला होता. (स्थानपोथी, अळजपूर ते लोणार, पानें ८–१२ पाहा).

आणखी एक महत्त्वाचा प्रसंग हा पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधक मंडळांतील' आहे. पुण्याचे प्रासिद्ध इतिहास संशोधक श्री. यशवंतराव गुप्ते यांनी 'श्री[illegible]गर' (सिन्नर) येथील 'भीलमठा' संबंधीं कांही टाचणें व विशेषतः 'गोंदेश्वर' 'पञ्चे[illegible]' हीं प्राचीन देवळें व त्यांचे फोटो, हीं मंडळाला सादर केलीं होतीं. तसेंच नेवासें (निधिवासें) याच्या मार्गावर कुमरेश्वर व कणेरेश्वर हीं स्थानें आहेत, असें सांगितलें होतें. त्यावर वरील स्थानांसंबंधी 'स्थान पोथीं' मध्ये असलेला उतारा आणि 'लीळा चरित्रांत' असणारे प्रसंग याचें एक टांचण करून, भा. इ. सं-मंडळा पुढे श्री. ह. ना. नेने यांनी वाचून श्री. गुप्ते यांचें विवेचन कांही बाबतींत अपूर्ण होतें तें पूर्ण केलें. याहिपेक्षा महत्त्वाचा प्रसंग म्हणजे प्रिन्सिपाल मिराशी यांचा, [2] 'हैद्राबाद (दक्षिण) येथे उपलब्ध झालेला यादव कालीन ताम्रपट व रामदेव यादवाचे गादीवर आरूढ होणें' या विषयी वाचलेला निबंध; या निबंधांत उल्लेखिलेलीं गांवें 'लीळा चारित्र' व 'स्थान पोथी' यांत अनुक्रमासह सापडलीं. ही माहिती देण्याचा उद्देश एवढाच की 'स्थान पोथी' केवळ महानुभावांनाच उपयोगी नसून, ती महाराष्ट्राच्या भूगोलविषयक संशोधनास अत्यंत उपयोगी आहे, हें निश्चित पुराव्यावरून सिद्ध होत आहे.

४. डॉ. कोलते यांनी परिश्रमपूर्वक प्रस्तुत आवृत्ति तयार केली आहे. मूळ सांकेतिक लिपींतील 'स्थानपोथी' सरळ बाळबोध लिपींत उतरून, जुन्या पांच हस्तलिखितांच्या आधारें तिची संहिता तयार केली आहे. निरनिराळ्या हस्तलिखितांत अधिक आढळलेला मजकूर परिशिष्ट १ मध्ये दिला आहे. दुसरें परिशिष्ट विशेष परिश्रमपूर्वक केलें आहे. त्यामध्ये 'स्थान सूचि' असून, तें तें ठिकाण आधुनिक नकाशांत कोठे सापडेल, याचें उत्कृष्ट मार्गदर्शन केलें आहे. यांतील बारीक गांवें पाहातांना अनेक नकाशे त्यांना पाहावें लागले. कांही गांवांचीं नांवें आज बदललीं असल्याने, त्यांची नांवें निश्चित करणें, हें कठिण व महत्त्वाचें कार्य डॉ. कोलते

---

१ सरदेसाई स्मारक ग्रंथांत हा शिलालेख व स्थानपोथींतील उल्लेख वाचकांना पाहावयास सांपडतील.

२ हा महत्त्वाचा निबंध, ताम्रपटासह व उल्लेखित गावांवरील विस्तृत टांचणासह प्रसिद्ध होण्याच्या बेतांत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांनी केलें असल्याने त्यांच्या चिकाटीची व व्यासंगाची सत्वपरिक्षा झाली आहे म्हणून त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. तिसरें परिशिष्ट म्हणजे 'स्थान पोथी' मध्ये उल्लेखिलेल्या देवता, 'स्थानपोथी' मधील उल्लेखिलेलीं देवळें व विविध देवता हाहि एक संशोधनाचा विषय होण्याइतका महत्त्वाचा भाग आहे. या सर्वांचा संबंध प्राचीन महाराष्ट्राशी आहे ही प्रस्तुत गोष्ट विसरून चालणार नाही. चौथें परिशिष्ट म्हणजे प्राचीन शब्दांचा कोश; यांत शिल्पशास्त्रातील अनेक शब्द आहेत; उदाहरणार्थ, त्राळाणे (सज्जा), भांड (टेकू देण्यासाठी बांधलेली भिंत), माळवध (धाबें), साजे (लहान देऊळ), शुकनाशी (मोरी), बारव (पायऱ्याची विहीर) खांडदेउळी (पडकें देऊळ), खातें (भिंतीतील लहान देवळी), जगती (आवारा भोंवतालची भिंत), पन्हीवा (पन्हळ), इत्यादि.

चिकित्सक व मार्मिक प्रस्तावना लिहून 'स्थान पोथी'विषयक विविध प्रकारची माहिती डॉ. कोलते यांनी दिल्याने, वाचकांना उत्तम मार्गदर्शन झालें आहे. निरनिराळ्या हस्तलिखितांची चिकित्सा, पोथीचा लेखक व लेखनकाल, 'स्थानपोथी' निर्माण होण्याची कारणें, स्थानांचे प्रकार, लीळाचरित्र व स्थानपोथी यांचा परस्परसंबंध, स्थानपोथीचे भौगोलिक महत्त्व, गांवाचे उल्लेख व त्यांची नांवें, तत्कालीन देवता, वास्तुकलेंतील निरनिराळे आलेले शब्द, इत्यादि महत्त्वाच्या प्रश्नांची तर्कशुद्ध चर्चा करून डॉ. कोलते यांना 'स्थानपोथीं'चा परिचय उत्कृष्टपणे करून दिला आहे.

५. 'स्थानपोथी' व 'स्थळपोथी' यांत भेद आहे; दोन्ही एक नव्हेत येवढेंच नव्हे, तर दोहींचे प्रतिपाद्य विषय देखील भिन्न आहेत. निरनिराळ्या मतांतरांची चर्चा, निरनिराळ्या पक्षांची बाजू ज्या पोथींत मांडलेली असते ती 'स्थळ पोथी' होय. ज्ञानेश्वरीतील तेराव्या अध्यायांत 'स्थळ' शब्द या अर्थानें वापरलेला आढळून येईल. श्रीचक्रधरांच्या वचनांविषयी अर्थ करणारे निरनिराळे पक्ष आहेत, त्यांची मांडणी व्यवस्थित करून 'गुर्जर शिवव्यास' यांनी 'स्थळपोथी' तयार केली आहे. (महानुभाव वाङ्मय पाहा) तेव्हा या दोन गोष्टींचा वाचकांनी घोटाळा करूं नये.

६. लीळाचरित्रांतील प्रसंगाचा अनुक्रम व 'स्थानपोथी' मधील स्थानें यांच्या मध्ये कांही वेळा विसंगति दिसते. लीळाचरित्रांत कांही गांवें एकापेक्षा अनेक वेळा येतात; अशा वेळीं 'स्थानपोथींत' माहिती एकत्रित करून दिलेली दिसते, त्यामुळे कांही पुढील भागांत आलेलीं स्थानें पहिल्याच प्रसंगीं देऊन टाकलेलीं आढळतील. उदाहरणार्थ, नाशिक, पैठण, नेवासें, डोमेग्राम, इत्यादि गांवें पाहा. पैठण संबंधी पानें १३ ते २० यांत आलेली माहिती उत्तरार्ध लीळा-चरित्रांत निरनिराळ्या प्रसंगीं लागू पडणारी आहे. सारांश, लीळाचरित्राच्या वाचना बरोबर स्थानपोथी वाचून, त्या त्या स्थळांची जागा निश्चित करणें महत्त्वाचें काम आहे. नाहीतर चूक होण्याचा संभव आहे.

७. स्थानपोथींत २०० पेक्षा अधिक गावांची माहिती आली आहे. हीं गांवें महाराष्ट्राच्या ज्या भागांत आहेत, त्या त्या गांवांतील लोकांकडून माहिती मिळवून 'स्थानपोथी' मध्ये असलेल्या सूक्ष्म माहितीचा खरेपणा ठरवावयाचा आहे. प्रस्तुत

 ग्रंथाच्या प्रकाशनामुळे, या कार्याला एकप्रकारे साधन उत्पन्न झालें आहे. आपआपल्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गांवाचा उतारा वाचकांनी पाहून आपल्या गांवांत सांप्रतकाळीं कोणत्या गोष्टी उपलब्ध आहेत याचा छडा लावणें शक्य होणार आहे.

८. प्रस्तुत ग्रंथ प्राचीन मराठी गद्याचा एक नमुना आहे. प्राचीन मराठीचें व्याकरण, म्हणूनहि या ग्रंथांतील शब्दांच्या रूपांकडे पाहाण्यासारखें आहे. ग्रंथाची भाषा सोपी आहे. लीळाचरित्रांतील उल्लेख पाहिले म्हणजे अर्थ समजण्यास उत्तम साहाय्य होईल.

९. अशा प्रकारे प्राचीन मराठीच्या 'भूगोलविषयक' दालनांत एक महत्त्वाची भर घालणारें पुस्तक प्रसिद्ध करून प्राध्यापक डॉ. कोलते यांनी आपल्या पूर्वीच्या नांवलौकिकाला शोभेल असेंच 'संशोधन' कार्य केलें आहे, हें निश्चित.*

ह. ना. नेने

(३) वत्सगुल्म महात्म्य (प्राचीन वाशीम)

वाशीम येथील 'पद्मतीर्थ प्रकरण' विदर्भांतील सर्वसाधारण वाचकाच्या परिचयाचें आहे. देवदानवांच्या समुद्रमंथनांतून कांही रत्नें निघाल्याची कथा पुराणप्रसिद्ध आहे. ह्या ग्रंथाचें प्रकाशन देखील पद्मतीर्थ प्रकरणाच्या मंथनातूनच उदित झालें व आज हा ग्रंथ 'हिंदु-संघटन-निधि ट्रस्ट'चे प्रमुख श्री. अण्णासाहेब डबीर यांच्या अविश्रांत परिश्रमामुळे प्रकाशित होत आहे. ग्रंथाच्या प्रारंभी प्रकाशकांनी या प्रकरणाचा डॉ. य. खु. देशपांडे यांनी प्रस्तावनेंत इतिहास निवेदन केला आहे, तो 'माहात्म्या'पेक्षाहि अधिक रोमहर्षक आहे.

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांची शंभर पानी प्रस्तावना हाच ह्या ग्रंथाचा सर्वांत महत्त्वाचा भाग असून त्यांत वत्सगुल्म अर्थात् प्राचीन वाशीम या तीर्थक्षेत्राचा उपलब्ध असलेला संपूर्ण इतिहास संशोधनपूर्वक संकलन करून येथे दिला आहे. डॉ. देशपांडे यांच्यां सारख्या पट्टीच्या इतिहाससंशोधकांनी हें संकलन केलें आहे एवढें सांगितलें म्हणजे तें किती उपयुक्त झालें असेल हें वेगळें लिहिणें नको. शंभर पानांच्या प्रस्तावनेनंतर 'वत्सगुल्म महात्म्यसार' हें मराठींत सुमारे ५० पृष्ठें दिलें असून पुढे उपलब्ध झालेलें 'वत्सगुल्म माहात्म्य' हें मूळाप्रमाणे संस्कृतांत तनिशे पृष्ठांत छापलेलें आहे. या महात्म्याचें मात्र अंतरंगसंशोधन अधिक बारीक रीतीने करण्यास पुष्कळ वाव आहे असें वाटतें. पूर्वापार समजुतीप्रमाणे माहात्में ही पुराणांचा भाग समजलीं जातात व 'अष्टादश पुराणानां कर्ता सत्यवती सुतः' या न्यायाने ह्या पद्म-पुराणांतील वत्सगुल्म-माहात्म्याचा कर्ता 'व्यास'च मानावा लागतो. परंतु हा अर्थवाद बाजूला सोडून या माहात्म्यांत आलेल्या वर्णनाचा अधिक कसोशीने पाठपुरावा केला तर त्यांत कर्त्याबद्दल नाही तरी माहात्म्याच्या रचनाकालाबद्दल अगदी हताशच व्हावें लागेल अशी कांही परिस्थिति दिसत नाही. खुद्द पद्म-पुराणांत हें महात्म्य अर्थात् दिलेलें नाही 'वत्सगुल्म' या तीर्थाचा केवळ उल्लेख मात्र आहे व इतर तीर्थक्षेत्र माहात्म्याप्रमाणे ह्याहि माहात्म्याची रचना

*[स्थानपोथीः संपादक—डॉ. वि. भि. कोलते, प्राध्यापक, नागपूर महाविद्यालय; अरुण प्रकाशन, मलकापूर, वऱ्हाड, पानें १४२, किं. १॥ रुपया]

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याच आधारावर केली आहे. परंतु खुद्द डॉ. देशपांडे यांनीच प्रस्तावनेंत भूगोल-ज्योतिष-वैद्यकविषयक, नृत्यगायनादि कला, स्थलपरिमाण, वजनें, नगरवर्णन व माहात्म्यकालीन सदाचारावर स्त्रीजीवनादर प्रकाश टाकणारी जी माहिती दिली आहे तीवरून त्यांना आज या माहात्म्याच्या रचनाकालाचा निर्णय निश्चितपणानें करता आला नाही. त्यांच्या मते या माहात्म्याच्या निर्मितीचा काळ त्यांतील यवनांच्या उल्लेखांच्या अनुरोधानें पांचव्या शतकापासून तों १७ व्या शतकापर्यंत जाऊं शकेल, एवढें व्यापक विधान त्यांनी केलें आहे. (पृ. ७५) प्रस्तावनाकारांनी गेलीं दोनतीन वर्षें या ग्रंथाच्या अध्ययनांत घालूनहि यापेक्षा अधिक मर्यादित अनुमान करता आलें नाही. तथापि ग्रंथ-संशोधनांत अनुमानापेक्षा अप्रकाशित साधनें सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीसमोर आणणें याच गोष्टीला अधिक महत्त्व आहे व हें कार्य वत्सगुल्म-विषयक संपूर्ण माहिती व या माहात्म्यांतील वर्णनावरून काढलेलीं कांही अनुमानें यांसह डॉ. देशपांडे व श्री. डबीर यांच्या महत्प्रयासामुळे उघडकीस आली याबद्दल या उभयतांचें अभिनंदन करणें अवश्य आहे.

आज आपणा समोर संपूर्ण माहात्म्य मूळ संस्कृतांत आहे. त्यावरून सर्वसामान्य चोखंदळ वाचकाला कांही ऐतिहासिक माहितीचे कण तर हातीं लागतीलच पण डॉ. देशपांडे यांच्या प्रमाणे संशोधनांत ज्यांची विशेष गति आहे अशा सुबुद्ध वाचकांलाहि ही माहिती उपलब्ध झाल्यामुळे तिचें सखोल संशोधन होऊन या महात्म्याच्या रचना कालावर अधिक प्रकाश टाकतां येईल असें वाटतें. साधनांच शोध तिचें वर्गीकरण व त्यावरून निष्कर्ष ह्या संशोधनाच्या पायऱ्या असल्यामुळे आज निदान पहिली पायरी या ग्रंथाच्या प्रकाशनानें सर्व चिकित्सकांना मोकळी झाली आहे. या ग्रंथाचें संशोधन कोणत्या प्रकारे करितां येईल याचें मार्ग-दर्शनहि डॉ. देशपांडे यांनी आपल्या अधिकारवाणीनें केलें आहे. यापुढील कार्य म्हणजे दिलेल्या माहितीला ' वाट पुसत ' पुढील अभ्यासाचें मार्गाक्रमण करणें हें होय. या माहात्म्याची इतर उपलब्ध माहात्म्यांशी अधिक सूक्ष्मतेने तुलना करून कांही लभ्यांश मिळू शकेल काय, पार्टिजरच्या ' कलियुगांतील वंशावळी ' या ग्रंथांत काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे या माहात्म्यानें कांही स्थलकालव्यक्तिविषयक नवा प्रकाश टाकण्यासाठी उपयोग होऊं शकेल काय, डॉ. देशपांडे यांनी काढलेले यवनम्लेंच्छांचे उल्लेख अधिक कसोशीनें तपासून त्यांतून आणखी कांही निश्चित अनुमान काढणें शक्य होईल काय, माहात्म्यकारानें वर्णिलेल्या सामाजिक परिस्थितीवरून कांही तौलनिक विचार करून लो. टिळक, डॉ. भांडारकर, राजवाडे वैद्य यांच्या परंपरेंतील आधुनिक संशोधकांना या प्रकाशनांतून कांही नवें ऐतिहासिक साहित्य मिळेल काय, असे प्रश्न आजच्या अभ्यासू वाचकापुढे निर्माण करील एवढें हें माहात्म्य खास महत्त्वाचें आहे. संशोधकांना हवें असलेलें हें मिष्टान्न उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रकाशक-प्रस्तावकांचें पुनः एकवार अभिनंदन करून या साधन-सामग्रीचें आवाहन अभ्यासकांना फलदायक होवो, अशी आशा व्यक्त करतों.

—माधव गोपाळ देशमुख

(प्रकाशक—श्री. शंकर गोपाळ डबीर, वकील, वाशिम, कोष्टवार मुद्रणालय वाशीम पृ. १७६ + २०० + २०, मूल्य १२ रुपये. शके १८७३, सन १९५१)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(४) आणखी कांहीं कविता

मर्ढेकरांच्या 'कांही कवितां'वर विस्तृत व सापेक्ष चर्चा झालेली आहे. त्या 'कांही कवितां'नी उठविलेलें वादळहि आतां निवळल्या सारखेंच आहे. आणि आतां कवीनें आपल्या 'आणखी कांही कविता' प्रसिद्ध केल्या आहेत. अर्थात् या कवितांनी 'आणखी' निराळी वावटळ उठण्याचा संभव नाही. कारण या नवीन कवितांत विषयाचें अगर अभिव्यक्तीचें नाविन्य नाही. मर्ढेकरांचा पुढील विकास या कवितांतून दृष्टीस पडत नाही. मर्ढेकरांच्या कवितासंबंधी जो मतभेद प्रगट झाला तो त्यांच्या काव्यांतील 'आशय' संबंधी व कवीच्या दृष्टिकोनाबाबत. आमच्या मतें मर्ढेकरांची कविता म्हणजे विफलतेचा केवळ आक्रोश आहे. मानवाची कांहींहि प्रगति झाल्याचे त्यांना वाटत नाही. यंत्रयुगानें निर्माण केलेल्या संहारक शक्तींमुळें क्षणभंगुर झालेलें मानवी जीवन, आर्थिक विषमतेमुळें मानवी जीवनाला आलेली क्षुद्रता व किळसवाणें स्वरूप व असंख्य जीवांची सांस्कृतिक कुचंबणा पाहून त्यांना वाटणारा तीव्र विषाद त्यांच्या कवितेंत व्यक्त झालेला आहे. सद्यःकालीन परिस्थितीसंबंधींचा त्यांचा उद्वेग त्यांच्या उपहासपर कवितेंत प्रगट होतो. मर्ढेकरांच्या काव्याचें जर कांही मोल असेलच तर तें त्यांच्या काव्यांतील प्रामाणिक प्रकटनाचें. त्यांच्या संवेदनाक्षम प्रतिभेला जें आकळिलें व जें त्यांनी अवलोकिलें ते त्यांनी आपल्या स्फुट कवितांत ग्रथित केलेलें आहे ज्याची प्रचीति आली तेंच त्यांनी आपल्या कवितांत सांगितलें आहे. व म्हणूनच त्यांची कविता नकली अगर बेगडी वाटत नाही एवढें खरें. त्यांचे विचार अनेकांना पटणार नाहीत, पण त्यांची कविता अप्रामाणिक वाटणार नाही. त्यांच्या दृष्टीनें वास्तवाचें जें दर्शन त्यांना झालें व त्यासंबंधी त्यांना जो तीव्र असंतोष वाटतो त्याचें सूचन त्यांच्या काव्यांत उत्कटतेनें प्रतीत होतें. या यंत्रयुगांत मानवाची झालेली असहाय परिस्थिति व विषमतेनें त्यांच्या जीवनाला आलेला भकासपणा त्यांना विकल करून सोडतो.

ह्या जन्मांतुनि असेंच जाणें
आज उद्यांची लावित संगत
कुणि पेरावा घाम आणखी
झोडावा कुणि अखंड पंगत

किंवा

अशा येथल्या संसारांत
जगण्याचाही चुकला पाढा
आणि शेवटी परिस्थितीचा
गळ्या खालती उतरे काढा

अथवा 'मनास पडली जर खिंडारें' 'मी एक मुंगी हा एक मुंगी' 'ह्या दुःखाच्या कढईची गा' ह्या कवितांत कवीनें प्रगट केलेले विचार तपासून पहाण्यासारखे आहेत. या विश्वाच्या अनिर्बंध गतींत मानवाचें क्षुद्र स्थान पाहून कवीला विषाद वाटतो.

शतशतकांच्या पायलन्स वरि
किती कावळे टिंबे देती
उभा जागती कियापदांचा
खडा पहारा पण रोबोंचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विज्ञान युगांत मानव हा रोबोसारखा–यंत्रासारखा–जड व अगतिक झाला आहे. त्याच्या ठिकाणीं कोणतीहि चेतना दिसत नाही. मर्ढेकरांच्या कवितेंत वैफल्य येथेंच प्रगट होतें. जगाचें व्यर्थ परिभ्रमण चालू आहे व मानवाचें अर्थहीन आयुष्यहि तसेंच चालू राहणार. सांप्रतची विषमता त्यांना तीव्रतेनें प्रतीत होते आणि मग ते उद्‌गारतात—

कुणि मारावें, कुणी मरावें,
कुणी जगावे खाऊनि दगड
पितळवून कुणि आयुष्यांना
ओतावे अन् सोन्याचे घड

किंवा,

कोठें अन्न कैंची चाड,
आडपडदा आयुष्य;
मात्र संभावितांसाठी
खाली पाट वर पुष्य

मर्ढेकर एवढें 'नागडें सत्य' सांगून थांबतात. परंतु जुलूम व आपत्ति नष्ट करण्यासाठी मानवानें केलेले प्रयत्न त्यांना दिसत नाहीत. मानवतावाद त्यांना पोरकट वाटतो. आशावाद त्यांना बालिश वाटतो. याचें कारण अहंवादी व्यक्तित्वामुळे सहानुभवाच्या अभावीं त्यांनी विश्व व मानव यांचें अखंड वैमनस्य गृहित धरलें आहे. खरें पाहिलें असतां आजची दुरवस्था निर्माण होण्यास भांडवलशाही व तिचे राखणदार जबाबदार आहेत. याच भांडवलशाहीपुढे नतमस्तक होणारी शासनसंस्था हीसुद्धां आरोपी ठरलेली आहे. याची तीव्र जाणीव जनतेस आहे व ह्या अन्याया-विरुद्ध झगडण्यास जनता सज्ज होत आहे. याच जाणिवेतून आजचें पुरोगामी नवकाव्य लिहिलें जात आहे. कारण अशा परिस्थितींत समाजाला मार्गदर्शन करणें, त्यांतून क्रांतिवीर निर्माण करणें आणि स्वतः समाजाचें कर्णधार होणें आजच्या कलावंताचें आद्य कर्तव्य होय. समाजाला चेतना देणें प्रगतिशील कलावंताचें विहित कार्य आहे. शेलीनें कवीला समाजाच्या जागृतीचा दूत म्हटलें आहे. कवींनींच जर वैराग्याचें अखंड गाणें चालू ठेवलें तर समाजानें नेतृत्वाकरितां कोणाकडे पहावें? समाजांतील अत्यंत सुसंस्कृत व जागृत वर्गानेंच जनतेच्या भावभावनांची हेळणा केली व निराशेचे उद्‌गार काढले तर त्या समाजाला सावरणारा कोणीही राहणार नाही. कवीचें कार्य समाजाला कार्योद्युक्त करण्याचें असते. उलट मर्ढेकरांनी मानवता-वादाच्या ध्येयाची सरसहा टिंगलच केलेली आहे. उथळ कृत्रिम आशावादी व मानवतावादी कविता त्यांना अभिप्रेत जरी असली तरी त्यामुळे अस्सल मानवतावाद व मानवाचा आशावाद टीकास्पद ठरत नाही! त्यांचेः—

सटीक मानवतेची टिपणी
पुन्हा वाचली अर्थ तोच तरि;

अगर

देवासाठी दगड पूजिला
मानवतेची अतां आरती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किंवा

उगाच दावा मानवतेचा
आणिक डंका सामर्थ्याचा

हे उद्गार पहा. त्यांच्या काव्यावर निराशेची काजळी छाया पसरली आहे.

जुन्या पुराण्या उत्साहाचें
खलास झालें कालच तेल
अवसानाचा उसन्या कूच कां
किती दावला तरि पावेल.

तसेंच

कितीक मरती नित्य नव्यानें
श्राद्धाची पण जुनीच रीत
बंद जाहल्या हृदयांतुनही
तडफत असती शद्वातीत.
बेकंबेचे तेच परोचे
जुनीच भाषा, नवे भरोसे
जुन्या कल्पना, नवीं तर्पणें
तीच गिरमिटें नवीन वळसे

अशा तऱ्हेने आशावादाचा उपहास कवीने केलेला आहे. हा 'रामदासाभिमानी' कवि अश्रद्ध झालेला आहे. मर्ढेकरांच्या कवितांत आध्यात्मिक परिभाषेचा वापर जरी असला तरी कवींची वृत्ति सश्रद्ध नाही. कांही कवितांतून कवीला व्यापकतेची ओढ लागली असावी असें वाटतें कवि म्हणतो—

ह्या गंगेमधि गगन वितळलें
शुभाशुभाचा फिटे किनारा
असशील जेथें तिथें रहा तूं
हा इथला मज पुरे फवारा.

कांही कवितांत गूढ रुपें आहेत त्यांचा अर्थ नीटसा लागत नाही. आणि हा कवितेचा गुण खास नव्हे !

प्रत्येक कवितेंत नैराश्याचा एकच एक सूर आहे.

अंधाऱ्या जगाची। हीच रीतभात
काजळाची वात। काळोखाला ॥

किंवा

माणुस म्हणतो चिरंतनाचे
मनांत माझ्या अस्सल किस्से.
चढेल तुसडी तेढीं नाती
नश्वरतेंतहि चिरका नखरा;

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्याच नेहमीचा कडवट वैतागाचा सूर आहे. आजचें आयुष्य ओंगळवाणें असेल, मानव आज हीन दीन झाला असेल, परंतु त्याच्या ठिकाणीं जग बदलविण्याचें सामर्थ्य आहे. तो भविष्याचा कारागीर आहे. ज्या धनिकशाहीनें आजची दयनीय दुर्दशा निर्माण केली त्या धनिकशाहीचा संहार करण्याइतकें सामर्थ्य व दुर्दम्य आशावाद त्याच्या ठिकाणीं आहे. ' समतेचे अधिराज्य ' व्हावे म्हणून त्याचे प्रयत्न चालू आहेत. जागृति निर्माण होत आहे. पण मर्ढेकर म्हणतात—

उगाच दावा मानवतेचा
आणिक डंका सामर्थ्याचा !!

विडंबनात्मक रचनेतून त्यांनी उपहास प्रगट केलेला आहे. पुष्कळशी कविता औपरोधिक आहे. मात्र 'गणपत वाणी बिडी पितांना' 'पांडुर संध्या चवथ्या प्रहरीं' या कविता करुण आहेत. मर्ढेकरांच्या ह्या कविता वाचल्यानंतर मर्ढेकरांची अनुभूति जर व्यापक झाली व मानवी जीवनाविषयीं ममत्व वाटलें तर ते तेजस्वी काव्य लिहूं शकतील व त्यांच्या काव्याला 'सामर्थ्याचा स्वर' लागेल अशी आशा वाटते.

समर्थ वाङ्मयाच्या प्रसक्त व्यासंगामुळे त्यांच्या कवितेंत ओजोगुण आहे. त्यांच्या ठिकाणीं उज्ज्वल कल्पनाशक्ति आहे. याचें प्रत्यंतर म्हणजे या संग्रहांतील 'दंवांत आलिस भल्या पहांटे' 'अभ्र रम्य पद्मिनी मोकळ्यां तुझिया केसांतून' या कविता वाचाव्या. तरल स्वप्नांप्रमाणें त्यांतील वातावरण मोठ्या नाजुकपणें वर्णन केलें आहे. उद्वेगाची कविता लिहिणाऱ्या कवीनें सौंदर्याची जुनी स्वप्नें रेखाटलेलीं आहेत. जगांतील साऱ्या सौंदर्यांची वाताहात झाल्याचें दुःख कवीला झालें आहे आणि म्हणूनच त्याने जुन्या गाण्याचे वेगळे सूर आळविलेले आहेत.

पां. ब. गाडगीळ

प्रकाशकः वासुदेव पुरुषोत्तम भागवत मौज प्रकाशन लिमिटेड
खटाव वाडी, मुंबई ४.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘स्टेनलेस’ला होता धोका !

★

काळोखाच्या अभद्र छाया
भिकार रस्ता, गलिच्छ गल्ल्या
मिणमिण जळती दिवे मोजके
उजेड पिंवळा त्यांच्या पुरता
कोंदट चाळी उघड्या खिडक्या
हातरुंदिची पुढें गॅलरी
मवाळ रेंदा पायाखालीं
सडून कचरा झाला गोळा
गटारांतुनी मच्छर सेना
करीत गूं गूं लढवी हल्ला
फर फर गेली एक दुचाकी
कुणी खोकलें बळी क्षयाचा
कोठें कुत्रे केंकाटें अन्
माडीवरुनी थुक् ! थुक् ! .टाळी.

कैक मवाली तगडे ठेंगू
घामट कुडतीं रुमाल हिरवे
तोंडाभंवतीं धूर घुटमळे
अचकट विचकट शिव्या नि गाणीं
माय कुणाची हवी कुणाला
दिल्ची भाषा घशांत फुटक्या
सैल तुमानी चड्डया अर्ध्या
ट्रेल फ्लॅशाची चाले चर्चा
‘पेअर साली निकली तोबा !’
पचास गेले पचीस आले
झिंगत शिरलें त्रिकूट गल्लित
ये भपकारा हातभट्टिचा
समोरून ये सावध कोणी
पगडी, चष्मा, काठी, जोडा
पानपट्टिचे वसकट ठेले
एखाद्यावर झगमग गर्दी
आरशास कुणि ओठ लावितो

कुणी मारिला कुणास ठोसा
किंचाळत तो गेला वेडा
‘प्यारी ! प्यारी ! बोसा बोसा !’
छुन् छुन्, छन् छन् आडोशाला
लाडिक कण्हणें ‘खुदा मरगयी !’

काळी घागर पोटोबाची
अपुरें लुगडें जुनें तांबडें
पोलक्यास नच एकहि गुंडी
मळकट चंची सडकीं पानें
मोजी नाणीं सौदेवाली
किति घासघिस माल न उंची
‘रुपया? वा ! वा !’ ‘चौदा आणे’
‘आणे बारा !’ अच्छा बेटा !’

छातीवरचे काळे गोळे
थप्पट मांड्या नखांत माती
माथ्यावरच्या जटांत गुंते
गालफडांचे द्रोण वाळले
क्वचित्च साबू देहा स्पर्शी
केरसुणीनें कचरा झटका
चालूं सगळा माल मामुली
या पेठेला हाच परवडे
कधिं न तुटवडा किंमत माफक
या केव्हांही दुकान उघडें
बारा आणे जिना उतरतां
पानांसाठीं वरतीं पैसा !

या जर नसत्या कळकट थाळ्या
ताटें निर्मळ असती दुर्मिळ !
पडते दिवसा चक्क दरवडे
‘स्टेनलेस’ला होता धोका !

—द. चिं. सोमण.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
डिसेंबर

आकाश

★

वसुधे तूं त्वरी
इवली, साजिरी
अंबर मी मोठे
मोठे पण खोटे
तुला धृति, कृति
प्रकृति, आकृति
व्याप माझा निळा
भास एक खुळा !

माझ्या अंगांतुनी
म्हणतात कुणी
गुलावी कोड्यांची
अंघे संध्या, प्राची
छे, छे, हा खट्याळ
निरर्थक खेळ
कवींना भुलवी
जनांना फसवी
उपाधी ही बाह्य
वंचना असह्य
मी निश्चल, भ्रान्त
तूं क्रान्त, उत्क्रांत
स्पष्ट तुझी शक्ती
माझ्यांत न व्यक्ती !

तुझ्यांत रवीच्या
ओजाच्या, तेजाच्या
आगीचें लोळण
स्पंदन, स्पर्शन
तुला हिमांशूच्या
मृदू चांदण्याच्या
प्रीतीचा, सुखाचा
लेप चंदनाचा !
जीवन तुष्टीची
सृष्ट , दृष्टतेची
लाधली तुजला
महोदार कळा
परंतु मजला
निर्मितीच्या कळा
माहीत नाहीं ग !

मेत्र माझ्या उरीं
लाविले मी परी
माझी काया सुकी
येंत्राला पारखी
वेध शक्तीशाली
तूंच, धरे खालीं
मेघांची उलटी
ओढ तुझ्या ओठीं !

महा तपस्विनी
महा तेजास्विनी
तुला गति, धाव
स्थिर मी फैलाव !
तुझ्यांत स्व भाव
मी मात्र अभाव,
तुला वेढी काम
मी मात्र निष्काम !

झालो मी अनन्त
जीवाला ही खन्त
सीमा तुझी [illegible]य
निःसीम मी शून्य !
तुला असे इष्ट
उद्दिष्ट, विशिष्ट
ध्येय, हेतू, लक्ष
ज्याच्यासाठीं वक्ष–
तुझें उचंबळे
जगे आणि जळे !
पण मला नाहीं
कांहीं, कांहीं, कांही
कशाचा ना स्पर्श
कशाचा ना हर्ष
कुठला उत्कर्ष ?
कुठला प्रकर्ष ?
नाहीं इथें चारा
नाहीं इथें वारा
नाहीं इथें आग
नाहीं इथें जाग
नाहीं इथें निद्रा
नाहीं इथें तंद्रा
कशाचाहि संग
कशाचाहि भंग
नाहीं, कुणी नाहीं
साथी, हम राही !

कला विशारद
विज्ञान कोविद
मानव जो साच
पुत्र तो तुझाच
तुझीया धुळींत
धुळीच्या कुळींत
जन्मला संग्राम
जन्मला विक्रम
जन्मली संस्कृती
श्रृति आणि स्मृति
तुझें तप घोर
तुझें रूप थोर
कांत आणि रुद्र
शांत आणि भद्र
तुझें हें लघुत्व
तत्व आणि स्वत्व
अती मोठे मोठे
नाहीं मुळी खोटे
विशाल मी क्षुद्र !
क्षुद्र, क्षुद्र, क्षुद्र !

माझ्नींचा थवे
चांदण्यांचे दिवे
रोज पाजळती
नव्या नव्या गती
माझ्यासाठीं नव्हे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नव्हें, मुळी नव्हे !
तेजाच्या या फौजा
मारतात पैजा
म्हणतात जा जा
धरणीला गाठा
लुटा सुख-साठा !
मी मात्र अपार
ध्वान्ताचें कोठार !

भूक विकाराची
भूक आकाराची
भूक मर्यादेची
भूक लघुत्वाची
लागली गे मला
गळाही सुकला
झालो मी विराट
झालो मी अफाट
कुणाची ही चूक ?
देवाचें चेटूक ?

—अनन्त आठले

कांहीं घडे जगावेगळें

अंगण धूसर निळें, मधोमध चंद्राभंवतीं खळें
इकडे तिकडे विखरुन पडले विझलेले भुइनळे

कुंद दिशांनी कुंतल केले खिन्नपणें मोकळे
त्यांतुन गळले नभपुष्पांचे अर्धोन्मीलित कळे

वंचित खंडित धरा तळमळे, हळवें जळ डुचमळे
नागरिकाच्या निःश्वासासम वारा हलु झुळझुळे

विरही वन सळसळे, ढाळतो पिंपळ पिवळीं दळें
बळेंबळें पावलें टाकिती रेंगाळत हीं पळें

उदासतेला वरदानच जणु अमरपदाचें मिळे
खिन्नपणाचा गंज चढुनिया सुकलीं भूमंडळें

तोंच–अगाई–रातराणिचा पदर सुगंधी ढळे
आणि माझिया जगांत कांहीं घडे जगावेगळें

—वसंत बापट

जीवनस्पर्श

कमाईच्या ओझ्याखाली शरीर हें भारावलें
पथीं पडाया लागलें वेडीं वाकडीं पाउलें
उसंत ना विसाव्याला झाले प्राप्त जाणे पुढे
केव्हा दऱ्याखोऱ्यांतून केव्हा ओलांडून कडे
विवंचना व्याध होता नित्य पाठीमागे उभा
वेळ कुठे पाहावया संगमाची दिव्यशोभा
क्षणोक्षणी भासे केव्हा कोणी कमाई लुटील
यश साऱ्या जीवनाचा साफ धुवून जाईल
असे एकाकी चालतां अकस्मात संध्याकाळी
शीत तेजाळ जीवन् चरणास न्हाऊं घाली
निळा चंचळ सावळा रुंजी घाली पायीं झरा
स्पर्श होता क्षणार्धांत शीण हारपला सारा

पायतळीची ती वाळू जरी वाहाया लागली
व्याकूळल्या जीवनाची कळी खुलाया लागली

—व्यं. ब. पुराणिक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आश्वासन

★

गहन निळ्या डोहांतुन
आकळती स्वप्नांची
कुजबुज ती हृदयाची
जलवलयें वरवरची !

काळ्या या मेघांतुन
आशांना चढते बळ
करुणेचा कुंभ उरीं
वरवरची ही जळजळ

खरखरीत भूमींतुन
अंकुर नव पालवती
स्नेह झरे झुळझुळती
विजिगीषा जागवती

हिरव्या या पर्णांतुन
सळसळते निःश्वासन
साउलिच्या या कुशींत
मिळते मज आश्वासन !

—राजा मंगळवेढेकर

उगीच

★

उगीच बोललों
अर्थावीण शद्ब
उगीच राहिलों
क्षणभरी स्तब्ध
उगीच [illegible]टेंत
अडवून तुला
वेड्या परी कांहीं
प्रश्न विचारला

उगीच हातांत
घेऊनिया हात
ओठीं दाबला मी
तेव्हा आवेगांत
उगीच शिरलों
दोघे आडरानीं
फिरूनिया आलों
निळ्या नभातुनी

उगीच वेलीचा
खुडला बहर
उगीच जिभेला
लाविलें जहर

—म. म. देशपांडे

निवारा

★

तुझ्या जीवनांत
घेऊं दे निवारा
उघडें जीवन
माझें हो, उदारा !

झांकायाला स्वप्न
मृदु प्रावरणें…
फेटाळलीं तुवां
एका नजरेनें !

—भावडींचे मन
स्वप्नांचे मनोरे
सृष्टि अलवेली—
अनाच्छादित रे !

मन झांकायाला
झाल्यें असमर्थ !
हृदय — पसारा
जाहला विवस्त्र !

वाढू लागे लाज…
वस्त्र दुसऱ्याला
कसें गडे मागूं
मन झांकण्याला !

तुझ्याकडे माझें
आजला लागलें
एका अपेक्षेनें
पाणावले डोळे—

—'तुझ्या जीवनांत
घ्यावा मी निवारा…
उघडें जीवन
माझें रे उदारा !'

—वसंत मोहरील

———

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चर्चा

आधुनिक काव्य ★

भ. श्री. पंडित
शरच्चंद्र मुक्तिबोध

मुक्तिबोध :—नमस्कार ! आज जरा विशेष कामाने आपणास भेटतों आहे ! म्हटलं, काव्यासंबंधीं आपणांशी जरा वेळ चर्चा करावी.....

पंडित :—वा: फारच छान ! आनंद झाला मला. बोलू या आपण ! वाटल्यास एकादा प्रश्न विचारा म्हणजे चर्चा चांगली सुरू करता येईल......

मुक्तिबोध :—बरं तर ! पहिला प्रश्न असा कीं जुन्या कवितेला आज ओहोटी लागली आहे असं मला जें मला वाटतं तें बरोबर आहे का ?

पंडित :—हें बघा ! काव्याला 'नवें जुनें, हीं विशेषणें लावताना आपण त्यांच्या बदलत्या स्वरूपामुळे प्रतीत होणारे दोन निरनिराळे कालखंड सुचवीत आहांत असें मला वाटतें. नवे जुने हे शब्द कालवाचक आहेत; काव्याच्या श्रेष्ठकनिष्ठतेशी त्याचा अर्थाअर्थी संबंध नाही......

मुक्तिबोध :—नवे जुने हे शब्द कालवाचक आहेत म्हणूनच गुणवाचकहि आहेत. कारण एका विशिष्ट कालांतील विशिष्ट समाजाप्रमाणें कवितेचं स्वरूप पालटतें हें आपणच कबूल करतां...काव्याचा समाजाशीं संबंध आहे हें तरी आपणास कबूल आहे ना ?

पंडित :—होय ! काव्य हा कवीचा उद्‌गार आहे. कवी हा समाजाचा घटक आहे. समाजाच्या परिस्थितींत यथाकाल परिवर्तन घडून येतें. त्यामुळें जो कवी ज्या काळांत व ज्या परिस्थितींत जन्मा येतो त्याच्या काव्यांत त्या काळाचें व त्या परिस्थितीचें प्रतिबिंब पडलेलें असतें. गेल्या पांच दहा वर्षांपासून मराठी कवितेचें स्वरूप बदललें दिसत आहे ही गोष्ट खरी आहे. तिचें स्वरूप बदललें आहे, म्हणून तिला नवीन कविता म्हणावयाचें तिच्या पूर्वीचें स्वरूप आतां दिवसेंदिवस कमी कमी आढळेल म्हणूनच त्याला जुनें म्हणायचें.

मुक्तिबोध :—नदीच्या पृष्ठ भागावर आकाशाचें प्रतिबिंब पडावें तसें काव्यांत सामाजिक परिस्थितीचें पडतें असें आपलें म्हणणें दिसतें. नदीचा प्रवाह ज्या प्रमाणें त्या आकाशापेक्षा निराळा असतो तसाच काव्याचा आत्मा समाजनिरपेक्ष असतो असें आपण सुचवूं इच्छितां !

पंडित :—होय ! पूर्वीच्या कालखंडांतले 'यशवंत' आजहि नव्या विषयावर कविता लिहीत आहेत. मात्र तिचा पेहेराव जुना आहे. गिरीश व काव्य-विहारी होहि जुन्या पेहेरावांत नवीन कवितेला नटवीत आहेत. अनिल स्वतःला नवीन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समजत असले तरी ते जुनेच आहेत! मात्र अंतरंग बहिरंग या दोन्ही बाबतींत ते मागे राहिलेले नाहीत......

मुक्तिबोध :—मी आपणाशी सहमत नाही. काव्यांत प्रकट होणाऱ्या भावनेचें अंतरंग न तपासल्यामुळें जुना पेहेराव व नवीन कविता अशा कल्पना निघतात. काव्यांत प्रकट होणारें नवीन म्हणजे आजचे स्थूल, ठोकळ सामाजिक विचार असा घेतल्यामुळे आपण यशवंत व काव्य विहारी यांच्या कवितेंत नाविन्य आहे असें म्हणूं शकतां. अनिल स्वतःस काय समजतात हे आपणाप्रमाणे मला जरी माहीत नसलें तरी नव्या काव्याचा आरंभ करणारे तेच पहिले श्रेष्ठ कवि होत असें माझे मत आहे. व तेव्हां हा घोटाळा नाहिसा करण्यासाठीं आधीं काव्यांतील भावना, तीं प्रकट करणारा कवि व ज्या समाजांत तो जगतो त्याशी कवीचा संबंध या बाबत विचार झाला पाहिजे.

पंडित :—बरें! तुमचें तरी या बाबतींत काय म्हणणें आहे तें सांगा?

मुक्तिबोध :—असें बघा, काव्यांतून कवीच्या भावनेचा आविष्कार होतो हें खरें ना?

पंडित :—होय!

मुक्तिबोध :—व कवी हा एका विशिष्ट कुटुंबांत; समाजांत व समाज परिस्थितींत जन्माला येतो व त्याचा पिंड एकंदर समाजातील प्रचलित अथवा नवीन अशा जीवन कल्पनेवर पोसला जातो आणि त्याच्या मनोवृतीच्या विकासा प्रमाणे प्रचलित अथवा नवीन जीवनाची ध्येयें व आकांक्षा त्याच्या वैयक्तिक भावनेतून प्रकट होत असतात......

पंडित :—ठीक आहे; पण यांत तुम्ही निराळे असें काय सांगत आहांत?

मुक्तिबोध :—निराळें असें कीं काव्य वेगळें व सामाजिक परिस्थिती तींत नुसती प्रतिबिंबित होते हें म्हणणें बरोबर नाहीं. कवीच्या काव्यांतील भावनेचा पिंडच मुळीं सामाजिक असतो. एका काळांतील भावना ही दुसऱ्या काळांतील भावनेपेक्षा आशयाच्या दृष्टीनें निराळीच असते. भावनेचें मूलरसायनच असतें तें!

पंडित :—तरीहि 'नवे' 'जुने' हे बहुद कालखंडच सुचवितात. तेराव्या शतकांतील ज्ञानेश्वर, सोळाव्या शतकांतील शेक्सपीयर व सतराव्या शतकांतील तुकाराम यांच्या काव्याचें स्वरूप जरी सद्यःस्थितींत जुनें असलें तरी त्या काव्यांतील श्रेष्ठता कोणत्याहि प्रकारें कमी नाही. नवें तें सारें चांगलें व जुनें तें टाकाऊ असा जो अभिनिवेशाने प्रचार करण्यात येतो त्या विरुद्ध माझा कटाक्ष आहे......!!

मुक्तिबोध :—शेवटीं आपण नव्या कवींचाच दाखला घेतला. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, हे त्या त्या काळचे नवे कवीच होत. समाज बदलतो म्हणजे प्रचलित समाजगर्भात बदलत्या गरजे प्रमाणे मानवी जीवनास अधिक पोषक अशा दुसऱ्या समाजाची वाढ होत असते व तिची पूर्ण वाढ झाली कीं नवा समाज जुन्या समाजाची कवचें छिन्न-भिन्न करून बाहेर येतो. कवि हा या मरणोन्मुख समाज व्यवस्थेचा पुरस्कर्ता असला तर त्याचें काव्य जुनें ठरतें व नव्या समाजाच्या आकांक्षेशीं समरस झाला असला तर त्याचें काव्य नवें ठरतें. प्रत्येक कवीच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यातील स्फूर्ति कोणत्या भूमिकेवरून झाली हें पाहतां माझें म्हणणें आपणास पटेल. ज्ञानेश्वर, तुकाराम यांची 'जों जें वांछील तो तें लाहो' व 'जे का रंजलें गांजलें' या बहुजनसमाजास् माणुसकीचा दर्जा देणाऱ्या धर्मकल्पनेनें त्या काळीं केवढी क्रांति केली होती हें का सांगावयास हवें ? आणि गर्भांत वाढणाऱ्या भांडवली समाजामुळे उन्मूलित होऊं पहाणाऱ्या, एका तुफानांत सांपडलेल्या, सरंजामशाही जीवनातील मूलभूत द्वंद्वच शेक्सपीयर साहित्याचेंहि मौलिक द्वंद्व नाहीं काय ?प्रत्येक मोठा कलावंत तत्कालीन समाजाच्या पलीकडे पहाणारा असतो तोहि याच अर्थानें......

पंडित:—म्हणजे जुने कवी हे आजहि मोठे मानले जातलि तर. मग नव्या जुन्याचा एवढा गाजावाजा करण्यांत काय अर्थ ! खरा कवि मग तो नवा असो कीं जुना असो सारखाच मानावयास हवा असें तुम्हास नाही वाटत !

मुक्तिबोध:—होय ! परंतु नवे जुनें हा प्रश्न उत्पन्न केव्हा होतो हें समजून घेतलेंच पाहिजे. जेव्हा जुन्या दृष्टिकोणामागील, जुन्या व्यवस्थेमागील, मानवहितपोषक प्रेरणा निघून जाते व नवें वास्तव, नवें तत्वज्ञान, नवी भावना उदयास येते अशावेळीं गतानुगतिकतेची कास धरणाऱ्या कवींची जाणीव संकुचित होणार नाही तरच नवल ! अशा संकुचित जाणिवेतून अस्सल काव्य कसें निर्माण होऊं शकतें ? अशावेळीं नव्या वास्तवातून नव्या प्रेरणेतून निर्माण होणारें काव्य जिवंत म्हणूनच काव्यगुणदृष्ट्याहि वरच्या प्रतीचें ठरणार नाहीं काय ? बरें ! आज जें नवेंकाव्य प्रसिद्ध होत असतें त्याच्या काव्यगुणाबद्दल आपणास काय म्हणायचें आहे ?

पंडित :—हो ! नवें काव्य हे काव्य या संज्ञेस पात्र आहे असें मला वाटतें ! त्याचें अंतःस्वरूप जसें वैचारिक तसेंच भावनिकहि आहे. सध्याच्या अस्ताव्यस्त जीवनावर आधारलेल्या त्यांतल्या विषयाप्रमाणेंच त्याचें बाह्य स्वरूप हेंहि काहींसें अस्ताव्यस्त पण अंतरंगास अनुकूल असें आहे. मर्ढेकरांच्या, विं. दा. करंदीकरांच्या, य. द. भाग्यांच्या आणि तुमच्या कवितेंत सामर्थ्य आहे यांत शंका नाही पण त्यांत सौंदर्याची जोड नाही. दहा वर्षांपूर्वी पुढे आलेल्या कुसुमग्रजांनी केशवसुतांचें सामर्थ्य व तांब्यांचें सौंदर्य या दोहोंची जोड साधली होती. तसें झालें तर तुम्हा मंडळींची कविता लोकप्रिय होईल. नाहीतर ती पुस्तकांतच पडून राहील......

मुक्तिबोध:— वा: आप नवकाव्यांत सामर्थ्य आहे असें एकीकडे कबूल करतां आणि दुसरीकडे त्यांत सौंदर्य नाही असेंहि आपलें मत दिसते. काव्यांत काव्यगुण असल्याशिवाय त्यांत सामर्थ्य कसें येईल ? दुसरें असें कीं आजची कविता लोकप्रिय नाही असेंहि आपलें म्हणणें. परंतु आज कविता फारशी गाइली जात नसली तरी पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक पटीनें वाचली जाते ! बरे तें राहूं द्या, आजच्या जीवनाचा उद्‌गार नवकाव्यांत आहे असें आपणास वाटतें काय ?

पंडित:— होय ! नवीन काव्यांत समाजजीवनावर भर दिलेला आहे. पहिल्या महायुद्धांत आपल्या देशाला प्रत्यक्ष आंच बसली नव्हती. युद्ध फक्त पश्चिमेसच होतें. परंतु नव्या महायुद्धांत जपान, ब्रम्हदेश, व सिंगापूर गोवलें गेल्यामुळें आपल्या देशास होरपळून निघावें लागले. त्यामुळें उध्वस्त जीवन, विस्कळित परिस्थिती निराशापूर्ण भविष्य या गोष्टी आजच्या कवीला दिसत आहेत तेव्हां नवकाव्यांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या गोष्टीवर भर असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांही नाही. जुनी कविता गेली तिला ओहोटी लागली आणि नवी कविता आली, भरती आली असें जे तुम्हांस वाटतें तें याचमुळें. दिवसेंदिवस आंतरराष्ट्रीय संपर्क वाढत असल्यामुळें अन्य राष्ट्रांतील विचारसरणीहि आपल्याकडील अभ्यस्त व नागर कवींवर परिणाम करीत आहे. रशियांतील विचारसरणीचीहि थरीच गडद छाया अत्याधुनिक कवितेवर पडली आहे! हें निराळें सांगावयास नकोच...

मुक्तिबोधः—एवढेंच नव्हे, ती विचारसरणी व तत्त्वज्ञान आजच्या विषम जीवनाचे सर्व प्रश्न सोडवूं शकेल या निष्ठेंतूनच नवकाव्य निर्माण होत आहे व म्हणूनच त्यांत आजच्या जीवनांतील सत्याचें दर्शन घडूं शकेल असे मला वाटतें आहे.

पंडितः—तुमच्या इतका विश्वास मला वाटत नाहीं. प्रामाणिक नवकाव्यावरोबर नकली नवकाव्यहि आजच निर्माण होत आहे. लैंगिकता हेंच कांही जीवनाचें एकमेव सत्य नव्हे. आजच्या कित्येक कवितांतून लैंगिक विषयावर जास्त भर देण्यांत येतो. त्यांत लोकमंगलापेक्षा विफलतेवर भर देण्यांत येतो हें तुम्हाला आढळत नाही काय? शिवाय दुर्बोध प्रतीकें व शुष्क, रुक्ष आणि नीरस भाषा या बाबतींतहि सुधारणा आवश्यक आहे. अशी माझी धारणा आहे.

मुक्तिबोधः—आपल्या म्हणण्यांतील सत्य नाकबूल करतां येणार नाही. आज नवकाव्याची नक्कलच होऊं पहात आहे हेंहि खरें. पण लोकमान्य झालेल्या काव्याची नेहमीच नक्कल होत आली आहे हें खरें नव्हे का? तसेंच यामुळें आज जें अस्सल प्रामाणिक नवकाव्य जें आहे त्यालाहि हिणकस ठरविण्याचा जो प्रयत्न होतो तोहि चुकीचाच आहे. आजच्या काव्यांतील विफलतेवरील भर आपणास आवडत नाही हें अगदीं योग्यच आहे. कवीचें कार्य समाजाच्या जाणिवेचा भावनात्मक दृष्ट्या विकास करणें हेच आहे! तेव्हां एकादा कवि हताश झाला तर त्याने परिस्थितीपुढे हात टेकले असा अर्थ होतो. त्यापेक्षा या विनाशांतहि जीवनाचें गतिशील पुरोगामी सत्य जे ओळखतात तेच खरे कवि होत. परंतु आज काव्यांत केवळ विफलताच प्रकट होत आहे असें आपण म्हणतां की काय?

पंडितः—नाही. नवकाव्यांतील पुरोगामी प्रवृत्तींचीहि मला जाणीव आहे. त्यांत जुन्या मोडकळीस आलेल्या संस्थांवर, अर्थशोषणांवर, अन्यायावर व अत्याचारावर, तसेंच सामाजिक समतेवर, मानवतेवर, सहानुभूतीवर जो भर आहे तो मला मनापासून पसंत आहे...

मुक्तिबोधः—एकंदर नवकाव्याविषयीं व त्याच्या गुणासंबंधी आपण तत्त्वतः एकमतच झालो आहोत असें म्हणावयास हरकत नाही. निराळ्या शद्बांत का होईना आजचा काळ जीवनाकडे सामाजिकदृष्ट्या बघण्याचा आहे हें आपण मान्य केलेलें दिसतें. म्हणूनच नवकाव्यांत जाणिवेची क्षितिजें विस्तारलेली दिसतात. खरें ना?

पंडितः—अत्याधुनिक कवींचे चारदोन काव्यसंग्रह बाहेर पडले म्हणजे यशवंत, मायदेव, यांची पुस्तकें कपाटांत बंद झाली असें कांहीं होत नाहीं. उलट त्यांची भावगीतें आजहि कानावर पडत आहेत.

मुक्तिबोधः—माझा आशय आपण लक्षांत घेतलेला दिसत नाही. माझें म्हणणें असें कीं आजच्या क्षणीं जें अस्सल प्रतीतीपूर्ण काव्य लिहिलें जाईल ते जुन्य

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वळणाचें असूं शकेल काय? व तसें असल्यास तशा प्रकारच्या काव्यास स्फूर्ति देणारी वास्तवता निघून गेल्यामुळे तें निर्जीव निर्माण नाही कां होणार?

पंडितः—जुनें काव्य आतां विपुल प्रमाणावर लिहिलें जाणार नाही हें खरें आहे. याचें कारण ज्या पांढरपेशा वर्गातील कवींनी तें निर्माण केलें त्यांचें तें सुखी जीवन आतां नष्ट झालें आहे. आतां पदवीला प्रतिष्ठा राहिलेली नाही, वकीली, डॉक्टरी, प्रोफेसरी, कारकुनी या पेशात गर्दी झाली आहे, व स्पर्धा होत आहे. प्रेमविवाह रोजच होऊं लागल्यामुळें त्यांतील बंडखोरीचा संघर्ष नष्ट झाला आहे. आणि स्त्रीने प्रत्येक क्षेत्रांत पदार्पण केलें असल्यामुळें तिच्या संबंधीचें कौतुक अथवा अभूतपूर्व आकर्षण उरलेले नाही. म्हणूनच आशागीतें व प्रेमगीतें आतां क्रमीक्रमी उत्पन्न होत आहेत. नव्या काव्यांत जाणिवेची क्षितिजें विस्तारलीं आहेत व तें अगदीं साहजिक आहे...

मुक्तिबोधः—विस्तारलेल्या जाणिवेंतून निर्मिलें जाणारें काव्य हें जुन्या काव्यापेक्षा—आपल्याच शब्दांत म्हणायचें तर पांढरपेशा वर्गाची जाणीव असलेल्या काव्यापेक्षा—वरच्या पातळीचें ठरेल हें मात्र आपण कबूल करण्यास तयार होणार नाही, खरें ना? पण आपण १९२० नंतरच्या काव्याचें वैशिष्ट्य त्या काळच्या सामाजिक भूमिकेसह मात्र अगदीं स्पष्ट करून सांगितलेंत; तसेंच नवकाव्यातील जाणिवेची क्षितिजें विस्तारलेली जी आपणास वाटतात त्याचें कारण काय?

पंडितः—नवकाव्यांत जाणिवेची क्षितिजें विस्तारली जाणें स्वाभाविकच आहे. जुन्या कवींच्या काळीं जग आजच्या इतकें निकटवर्ती परस्परसंबंधी व परस्परावलंबित झालेले नव्हतें. विमान, स्वरसंवाहक, अणुशक्ति आणि इतर अनेक वैज्ञानिक आविष्कारामुळें आजचें जग हें एका विशाल कुटुंबाप्रमाणें झालेलें आहे. मात्र तें प्रीतीचें होणार कीं भीतीचें होणार हें मात्र अजून निश्चित झालेलें नाही. पूर्वीच्या पिढींतील कवीचा समाजाशीं इतक्या जवळून संबंध येण्याचें कारण नव्हतें. त्याचें शिक्षण, त्याची पदवी, त्याचा पेशा, त्याचा पगार, त्याची पत्नी, त्याची पोरें, त्याची धूरचाकी त्याचे ठराविक मित्र असें त्याचें ठराविक जीवन होतें. सर्वसाधारण लोकांशी त्याचा संबंध येण्याचें क[illegible] कारण नव्हतें. आजच्या युगांत चिनी निर्वासितांची दुःखें घरींबसल्या क[illegible] पडतात. हिरोशिमाच्या चितेची हकीगत ऐकतांच घरबसल्या थरकांप होतो, दिल्लीहून लंडनला व लंडनहून दिल्लीला वायुवेगाने जातां येतें. पूर्वीच्या पेशाचें कुंपण आता सरलेलें असून वाफ, हवा, पाणी, कार्य-कारिणी इ० क्षेत्रें स्वातंत्र्यामुळें सर्वांना खुलीं झालीं आहेत. तेव्हां आतां नव्या नव्या जाणिवा निर्माण व्हाव्या आणि क्षितिजें विस्तारावीं हें स्वाभाविकच आहे.

मुक्तिबोधः—नवकाव्यांत जाणिवेचीं क्षितिजें विस्तारलीं तीं आपोआपच, असा आपला आग्रह दिसतो. तसेंच, तत्पूर्वीच्या कवींची संकुचित स्वतःपुरतें बघणारी वृत्तिहि स्वाभाविकच होती असा आपला खुलासा आहे. कारण काय तर त्या कवींचा समाजाशीं संबंध येणें स्वाभाविक नव्हतें. या बाबतींत मी आपणाशीं एकमत होऊं शकत नाहीं. केशवसुत ते बालकवी यांच्या काव्याची बैठक कांहीं सुखवस्तु मध्यम-वर्गीय जाणिवेची नव्हती. यशवंतादींचे काव्य मात्र मुख्य भारतीय कांक्षापासून अलग झालेलें व म्हणूनच आत्मसंतुष्ट होतें. त्यावेळीं राष्ट्रीय चळवळीचा इतिहास लिहिला जात होता तेव्हां 'कवींचा समाजाशीं संबंध न येणें स्वाभाविक होतें' असें म्हणणें

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोणास पटेल ! माधव ज्यूलियन वगळल्यास नवकाव्यपूर्व रविकिरणमंडळीजवळ जीवनदर्शन नव्हतें; व अंतर्यामीची ओढ नव्हती व म्हणूनच त्यांचें काव्य कौटुंबिक व पांढरपेशांना आवडणारें काव्य झालें, तें स्वाभाविकच होतें असें म्हणून कसें चालेल? उलट त्या कवींनी व्यापक समाजजीवनाशीं संबंध तोडल्यामुळेच ऱ्हासकालीन स्वप्नरंजनात्मक काव्य निर्माण झालें. समाज हा जसा कवीवर परिणाम करीत असतो तसाच कवी हाहि समाजावर परिणाम करतो. समाजास पुढे नेणारा असतो. आजहि समाजाकडे पाठ फिरविणारे कमी आहेत काय? आजचे नवकवी देखील आपो-आपच नवकवी झालेले नाहींत. समाजाचा असा आपोआपच परिणाम झाला असता तर सारेच कवि नवकवी झाले असते. तसे झालेलें नाही. हें स्पष्टच आहे. तेव्हां आजच्या जीवनाचें यथार्थ दर्शन करून घेण्याची तळमळ नवकवींच्या ठाई आहे हेंहि कबूल केलें पाहिजे. या तळमळीशिवाय आपोआपच आजच्या परिस्थितींत नवकाव्य निर्माण झालें नसतें. ही तळमळ पूर्वीच्या कवींच्या ठाई होती काय?

पंडितः— मला हें खरें वाटत नाही. जुन्याकाळीं साक्षरतेचा व शिक्षणाचा फारसा प्रसार नसल्यामुळें कविता रचणारे कवि हे मध्यम वर्गीतील होते व वाचकहि त्यौच वर्गीतील होते. त्यामुळें ब्राम्हण अथवा तत्सम प्रभु अथवा मराठे यांच्या समाजांतील स्त्रीदास्य, वैधव्य अगर केशवपन वगैरे सामाजिक अन्यायांकडे त्या कवींनी लक्ष पुरविलें. पण इतर समाजाकडे त्यांनी अजिबात दुर्लक्ष केलेलें नाही. केशवसुतांनी मजुरांवर व अंत्यजांवर लिहिलें आहे. माधवनुजांनीं दुष्काळग्रस्त पीडितांवर लिहिलें आहे, दत्तांनी दारिद्र्यावर लिहिलें आहे. रे. टिळकांनी, ब्राम्हण किंवा महार मी, गणी न कोणालाच कमी, असे उद्‌गार काढले आहेत आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांनी 'रामास वाट—नाही' ही अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्याबाबत कविता लिहिली आहे. आजचे कवी सामाजिक जाणिवेचें दळण पुन्हा पुन्हा दळतात. पूर्वीच्या काव्यांत तसा पुनरुच्चार नाही एवढेंच काय तें! केशव-सुतांनी तर गुलामाच्या प्रथेवर तळमळून उद्‌गार काढले आहेत. आजच्या कवींनी बंगालच्या कृत्रिम दुष्काळावर व पंजाब नौखालीतील हत्याकांडावर व स्त्रियांच्या अपहरणावर कांही लिहिलें आहे कां?

मुक्तिबोधः—नव्या कवींनी ज्या विषयांवर लिहिलें आहे ते विषय सोडून इतर विषयांवर लिहिलेलें नाही. काय लिहिलें नाही हें पाहण्यापेक्षां काय लिहिलें आहे तें पहावें असें मला वाटतें. नाही तर मोठा अनवस्था प्रसंग मोठमोठ्या कवींबाबत ओढवेल. माझें म्हणणें एवढेंच होतें की केशवसुतांनी व्यक्तिनिष्ठ कवितेची व्यक्ति-मुक्तीच्या तत्वावर आधारलेली पुरोगामी काव्यपरंपरा सुरू केली. पुढे रविकिरण-मंडळ काळांत तिचा ऱ्हास झाला. आज समाजनिष्ठ दृष्टिकोणातून नवी कविता लिहिली जात आहे व कवी स्वतःच्या भावनेचे पृथःकरणहि सामाजिक दृष्टिकोणातूनच करतात. व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोण व सामाजिक दृष्टिकोण हाच पूर्वीच्या व आजच्या कवितेतील फरक आहे. आजच्या वास्तवाच्या सम्यकदर्शनानंतर व विश्लेषणानंतर आजचें Life Principle ही पुरोगामी सामाजिकताच असल्यामुळें या दृष्टिकोणाचा पुरस्कार नेटाने करण्यात येतो. तसें केल्यासच काव्य अधिक जिवंत व्यापक [illegible] होऊं शकेल. आजच्या क्षणीं जुन्यास स्फूर्ति देणारे विचार व वास्तवता नसल्यामुळें त्यां वळणाचें काव्य निर्माण झाल्यास तें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तकलादी ठरेल असें सुचविण्याचा अमचा हेतु असतो. असो आपला वेळ संपत आलेला आहे. बरें एक प्रश्न आणखी विचारतो. काव्यगुणांचा कवीच्या जीवना-संबंधीच्या दृष्टिकोणाशीं संबंध असतो का ?

पंडितः—कवीचा जीवनसंबंधीचा दृष्टिकोण व त्यांतील काव्यगुण यांचा अवश्य संबंध असतो. मात्र तो कवि प्रांजळ व प्रामाणिक पाहिजे.

मुक्तिबोधः—तें धरूनच चालायला हवें !

पंडित'— कवीचा जीवनसंबंधीचा दृष्टिकोण जर निराशेचा असेल तर त्याच्या काव्यांत करुणा व भीति यांचा संचार दिसेल. तोच जर आशेचा असेल तर त्यांत उल्हास प्रेम व नाविन्य यांचा समावेश आढळेल. रामदासांचा दृष्टिकोण कसा तेजस्वी होता हें त्यांच्या समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।। या त्यांच्या उद्गारांवरून दिसेल. इतर अनेक कवींचे असें उद्गार उदा-हरणादाखल देतां येतील. माझें म्हणणें एवढेंच कीं काव्यानें अंतःकरणाची पकड घ्यावी. 'हे विश्वचि माझें घर' किंवा 'जो जें वांछिल तो तें लाहो प्राणिजात' किंवा 'जें कां रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा।' हे तुकोबांचे उद्गार पूर्वी जितके ताजे होते तितकेच आजहि ताजे आहेत. काव्य केव्हाहि निर्माण होवो त्यांत नवनवोन्मेष हवा असें मी मानतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिपणे

(१) प्रादेशिक भाषा आणि सरकारी शाळा

द्विभाषी आणि बहुभाषी राज्यांत भाषाविषयक संघर्ष थोड्याफार प्रमाणांत अपरिहार्यच होऊन बसतात. हे संघर्ष टाळण्याचा एक निश्चित मार्ग म्हणजे भाषावार प्रांतरचना तातडतोब अमलांत आणणें, हाच आहे. पण या प्रश्नाबाबत काँग्रेस पक्षीय सत्ताधाऱ्यांकडून जें धरसोडीचें व दिरंगाईचें वर्तन होत आहे, तें जितकें चीड आणणारें तितकेंच आतां कंटाळवाणें देखील झालेलें आहे. या प्रश्नाबाबत शाब्दिक टीकेच्या पलीकडील अशी कृतिरूप योजना अमलांत आणल्याशिवाय हा प्रश्न धसास लागणें दुरापास्त झालेलें आहे.

भाषिक संघर्ष काटेकोर न्यायी वर्तनाने पुष्कळच कमी तीव्र करतां येणें शक्य आहे. पण याहि बाबतींत काँग्रेसनिष्ठ राज्यसरकारांकडून वारंवार निराशाच पदरी पडते. याचे एक ताजें उदाहरण मुंबई राज्यांत नुकतेंच घडलें आहे. बेळगांव जिल्ह्यांत नन्दगड येथे 'केंद्रशाळा' आहे. नन्दगड भाग हा मराठी भाषी आहे. या शाळेसंबंधीं मुंबई सरकारच्या सर्वोच्च शिक्षणाधिकाऱ्याने अधिकृत सरकारी धोरणाला अनुसरून एक हुकुम काढला होता. या हुकुमान्वयें मराठी शाळेचे हेड-मास्तर हेच केंद्रशाळेचे सूत्रचालक राहावेत व शाळेचा कारभार त्यांच्याच तंत्राने चालावा, असें घोषित करण्यांत आलें होतें. परंतु खालच्या स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यांनी या हुकुमाची अंमलबजावणी इतक्या विचित्र व विपरीत रीतीने केली की, तेथील सुप्त मराठी–कानडी वादाला विलक्षण तीव्रता प्राप्त झाली. इतकी की, नंदगडला या वादाचा निकाल लावून घेण्यासाठी एका 'कृति समिती'ची स्थापना करावी लागली. मराठी बहुसंख्य जनतेवर झालेल्या अन्यायाचें परिमार्जन करण्याच्या हेतूने या समितीने जोराचे प्रयत्न सुरू केले. दि. २५-११-५१ इ. रोजीं मुंबई राज्याचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री, ना. बाळासाहेब खेर, हे बेळगांवला आले असता त्यांच्याकडे वरील कृतीसमितीने एक शिष्टमंडळ पाठविलें आणि आपलें म्हणणें त्यांच्यापुढे पुन्हा एकवार सादर केलें. 'या प्रकरणावर शेवटचा पडदा टाकून सोक्षमोक्ष करून घेण्याच्या इराद्याने'च त्यांनी हा खटाटोप केला.

ना. बाळासाहेब खेर यांनी हें प्रकरण निकालांत काढलें किंवा नाही, हें अद्याप कळावयाचें आहे. कानडी–मराठी वाद हा या प्रकरणाच्या मुळाशी असल्या-मुळे आणि सांप्रत सार्वत्रिक निवडणुकीची धामधूम सुरू झालेली असल्यामुळे, हें प्रकरण न्याय्य रीतीने निकालांत काढतां येणें ना. बाळासाहेबांना फार जड जाईल, हें उघड आहे. तरीपण नंदगडच्या कृतिसमितीने आपल्या पत्रकांत केलेली एक सूचना ना. खेरांना सहज अमलांत आणतां येईल. "मराठी हेडमास्तरच्या नेतृत्वा-खाली संयुक्त केंद्रशाळा कन्नडिगांना पसंत नसेल तर फक्त मराठी शाळेलाच

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केंद्रशाळेची मान्यता मिळावी"—अशी ही सूचना आहे. पण ही सूचना अमलांत आणल्यास कन्नडिगांसाठी निराळी व्यवस्था करावी लागेल व ती जादा खर्चाची बाब म्हणून अव्यवहार्य गणली जाईल, हें निश्चित आहे. सारांश काय तर मराठी हेडमास्तरांचें नेतृत्व कन्नडिगांना पसंत नाही म्हणून एकाच केंद्रशाळेचा कारभार परस्परविरोधी अशी उभयान्वयी नेतृत्वाखाली चालू ठेवून मराठी व कानडी या उभयभाषाभाषी लोकांतील तेढीला उग्रता आणणें आणि शिक्षणाचा खेळखंडोबा करणें, ही नीति ना. खेरांना अधिकृत सरकारी धोरणाची पायमल्ली करून चालू ठेवावी लागणार!

एकीकडे शिक्षणाचें पवित्र क्षेत्र सर्व राजकीय व अराष्ट्रीय दोषांपासून अलिप्त ठेवण्याचे निर्धार सर्व राष्ट्रीय पुढाऱ्यांनी वारंवार जाहीर करावेत आणि दुसरीकडे, या निर्धारांची नादान पायमल्ली खुशाल चालू द्यावी, असे प्रकार सर्व द्विभाषी व बहुभाषी राज्यांत सर्रास चालू आहेत. हे अन्याय व राष्ट्रघातकी प्रकार भाषावार प्रांतरचना करून कायमचे संपुष्टांत तरी आणले गेले पाहिजेत अथवा भारताच्या राज्यघटनेत मान्यता दिल्या गेलेल्या कोणत्याहि भाषेवर कदापिहि अन्याय होणार नाही, असें न्यायनिष्ठुर धोरण अमलांत आणण्याची हिम्मत तरी बाळगली पाहिजे. यापैकी एकाहि धोरणाची अमलबजावणी करूं न शकणाऱ्या पक्षाला वा पुढाऱ्यांना, राज्यशासनांत यापुढे यत्किंचित्‌हि थारा मिळतां कामा नये, असें आमचें स्पष्ट मत आहे. मुंबई राज्यांतील व मध्यप्रदेशांतील मराठी जनतेचे पुढारी आपल्या मायबोली-वर होणारे अन्याय यापुढे सहन करणार नाहीत, अशी अपेक्षा करावी कां?

—पु. यं. दे.

(२) जयपूरची अ. भा. इतिहास परिषद्

जयपूर येथे येत्या नाताळांत भरणार असलेल्या अ. भा. इतिहास परिषदेचें अध्यक्षपद महाराष्ट्राचें सुप्रसिद्ध रियासतकार रा. ब. डॉ. गोविंद सखाराम सरदेसाई हे मंडित करणार आहेत. डॉ. सरदेसाई यांचें वय आज ८७ वर्षांचे आहे; व भारतीय आयुर्मान लक्षांत घेतां हें व[illegible] [illegible]रोखरी शरपंजरीं पडून नामस्मरण करीत 'देवाज्ञेची' वाट पाहण्याचेंच असतें. [illegible]; डॉ. सरदेसाई हे या वयांतहि आपलें इतिहास रचनेचें कार्य अदम्य उत्साहानें करीत असून, त्याला पोषक असे नवनवीन उद्योग सतत हातीं घेत असतात. २५ वर्षांपू[illegible] त्यांचा एकुलता एक गुणी पुत्र श्यामकान्त हा स्वित्झर्लंडांत मृत्युमुखीं पडला. [illegible]व्हां वृद्ध रियासतकारांवर खरोखरी आकाश कोसळल्यासारखे झालें, पण, पुत्रवियोगाचे तें हलाहलासारखें दुःख त्यांनी धैर्यानें गिळलें, व इतिहास हाच आपला पुत्र मानून भारतवर्ष आणि महाराष्ट्र यांच्या इतिहास रचनेचे कार्य निष्ठेनें पुढें चालविलें. त्यांच्या रियासतीचे तीन वेळा पुनरावृत्त झालेले खंड, त्यांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या इंग्रजी इतिहासाचे खंड, त्यांनी संपादून प्रसिद्ध केलेले पेशवे दप्तराचे ४५ भाग इत्यादि इतिहासाच्या संशोधनाचे, संपादनाचे, संकलनाचे आणि रचनेचे जे विविध कार्य त्यांनी गेल्या ५३ वर्षांत केले आहे, त्याला निदान मराठी वाङ्मयांत तरी उपमा आढळणार नाही. १८९८ सालीं बडोद्याचे विद्याप्रिय अधिपति कै. सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या सेवेंत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असतांना, ज्यावेळीं त्यांनी प्रथम मुसलमानी रियासत प्रसिद्ध केली, त्यावेळीं त्यांच्या हातून अशाप्रकारचें प्रचंड राष्ट्रीय लेखनकार्य पुढें व्हावयाचें आहे, हें रियासत-कारांच्या स्वप्नींहि आलें नसेल! अशा या महाराष्ट्राच्या थोर कर्तबगार पुत्राचा सन्मान अखिल भारतांतील इतिहासज्ञांनी अग्रपूजेचा मान देऊन करावा, यांत उभयपक्षीं औचित्य आणि गौरव आहे, असेंच कोणीहि म्हणेल.

नाणक संशोधन परिषदेचें अध्यक्ष

अ. भा. इतिहास परिषदेबरोबरच जयपूर येथें न्युमिस्मॅटिक सोसायटीचें म्हणजे नाणक संशोधन परिषदेचें जें अधिवेशन भरावयाचें आहे, त्याचें अध्यक्षपद याहि वर्षी नागपूरचे विख्यात पंडित म. म. प्रा. नानासाहेब मिराशी हे विभूषित करणार आहेत. भारतांत 'एपिग्राफी' म्हणजे पुरातन लिपिशास्त्र याचे जे थोडे अभिज्ञ आहेत, त्यांत प्रा. मिराशी हे अग्रगण्य असून, 'एपिग्राफिया इंडिका'च्या संपादक मंडळावरहि ते आहेत. गेल्या २५ वर्षांत गुप्त, कलचुरि, वाकाटक, यादव राजवंशांचे शिलालेख, ताम्रपट, शासनें वगैरेंचें वाचन आणि संशोधन करून प्रा. मिराशी यांनी मध्य-भारत आणि महाराष्ट्र यांच्या प्राचीन इतिहासावर नवीन मनोज्ञ प्रकाश पाडला आहे. कालिदासावरील त्यांचा मराठी प्रबंध जरी विद्वन्मान्य झालेला असला, तरी त्यांचे इतर मूलगामी महत्वाचे संशोधन बहुंशीं इंग्रजीतून झालेलें असल्यामुळे, मराठी वाचक वर्गाला साहजिकच त्याची असावी तितकी कल्पना नाही. प्रा. मिराशी यांच्या नाणक शास्त्रांतील नैपुण्याबद्दल त्यांना पूर्वीच पदक मिळालेलें असून, भारत सरकारनेहि 'महामहोपाध्याय' ही पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा गौरव केलेला आहे. तथापि आमच्या नागपूर युनिव्हर्सिटीला मात्र अखिल भारतांतील इतिहासज्ञांनी सन्मानिलेल्या या नागपुरांतील श्रेष्ठ पंडित–संशोधकाला 'डॉक्टरेट' देण्याची अद्याप बुद्धि होत नाही! जयपूर येथे महाराष्ट्राच्या दोन इतिहासज्ञ पुत्रांचा गौरव होण्याचा जो हा सुयोग आला आहे, तो निःसंशय अभिनंदनीय होय.

एक बहुमोल नवा ग्रंथ

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि मुंबई मराठी समितीचे कार्यवाह श्री. अ. का. प्रियोळकर यांनी मुक्तेश्वरकृत महाभारताच्या आदिपर्वाचे बारा अध्याय संशोधून प्रसिद्ध केले आहेत. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांत 'मुंबई मराठी संशोधन समिति' (की मंडळ?) ही संस्था जुन्या मराठी वाङ्मयाचें संशोधन आणि संपादन करीत असते. या संस्थेला मुंबई सरकार आणि मुंबई विद्यापीठ या दोहोंचाहि आश्रय लाभलेला असून खुद्द या ग्रंथाच्या प्रकाशनाला मुंबई विद्यापीठानें ७५० रु. ची देणगी दिलेली आहे आणि मुंबईचे मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर यांचा पुरस्कारहि लाभलेला आहे. श्री. प्रियोळकर यांनी मुक्तेश्वराच्या आदिपर्वाच्या २९ हस्तलिखित प्रतींचे अत्यंत बारकाईनें संशोधन करून त्यांतील पाठपाठांतरे चिकित्सेनें पडताळून पाहून व मुक्तेश्वरासंबंधीची सर्व उपलब्ध माहिती संकलित करून हा ग्रन्थ उत्कृष्ट-रीतीनें संपादन केला आहे. 'श्रीमुक्तेश्वराचा शोध' या त्यांच्या लेखांतील सर्वच विधानें किंवा निष्कर्ष जरी कदाचित् मान्य झाले नाहीत, तरी कै. बाळकृष्ण अनन्त भिडे यांनी स्वतन्त्र बुद्धीनें मुक्तेश्वराच्या चरित्रासंबंधी ज्या नवीन उपपत्ति बसविण्या-चा प्रयत्न केला होता त्याच दिशेनें पुढें पाऊल टाकून मुक्तेश्वराच्या' चरित्रांतील 'लीला–विश्वंभरा'चे कोडें उलगडण्याच्या बाबतींत जें यश श्री. प्रियोळकर यांनी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मिळविलें आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केलें पाहिजे. 'मुक्तेश्वर' या त्याच्या नांवाचाहिं जो 'शोध' श्री. प्रियोळकर यांनी, ठिकाठिकाणच्या अनेक छायाचित्रांसह, घेतलेला आहे, तोहि संशोधकांना चिंतनीय वाटेल. श्री. बाळासाहेब खेर यांनी या ग्रंथाला लिहिलेल्या पुरस्कारांत सर्पपूजा आणि सर्पसत्र यांच्या संबंधी जे विचार प्रकट केले आहेत, तेहि संशोधनाला चालना देणारे आहेत. सारांश, मान्य साहित्य संस्थांकडून संशोधन-संपादनाचें कार्य कोणत्या पद्धतीनें आणि स्वरूपाचें व्हावें याची यथार्थ कल्पना या ग्रंथाच्या अवलोकनानें अभ्यासकांना येईल, यांत शंका नाहीं. मुक्तेश्वर वाङ्मयांत या ग्रंथाच्या प्रकाशनामुळें बहुमोल भर पडलेली असून, मुक्तेश्वराच्या भारताची उपलब्ध पर्वें श्री. प्रियोळकर हे या पद्धतीनें संपादन मराठी वाचकाच्या हाती देतील, अशी आशा वाटते.

ग. त्र्यं. मा.

३७३१५
दाखल नोंद क्रमांक
दिनांक १०.२.९४
६.
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

दोन नव्या नाटकांचें वाचन, मुहूर्त आणि भावी प्रयोग

वि. सा. संघ आणि नागपूर नाट्य मंडळ यांच्या सहकारितेने जो नाट्योत्सव वि. सा. मंदिर निधीच्या सहाय्यार्थ करण्याचें योजिलें आहे त्या नाट्योत्सवांत बेळगांवचे विनोदी लेखक आणि सिनेनट प्रा. पु. ल. देशपांडे यांचें 'अंमलदार' आणि नागपूरचे नाटककार श्री. नाना जोग यांचें 'भारती' हीं दोन नाटकें रंगभूमीवर आणण्याची योजना तयार होत आहे. वि. सा. संघाच्या कार्यालयांत या नाटकांचें वाचन अनुक्रमें श्री. मुकुंद जोग आणि श्री. नाना जोग यांनी दि. २९ व २८ सप्टेंबर १९५१ रोजीं केलें. हीं दोन्हीं नाटकें अत्यंत लोकप्रिय होतील असें साऱ्या उपस्थित श्रोत्यांचें मत पडलें. दि. ८ नोव्हेंबर रोजीं 'अंमलदार'च्या आणि दि. १२ डिसेंबर रोजीं 'भारती'च्या तालमींचे मुहूर्तविधी नागपूर नाट्यमंडळाच्या कार्यालयांत थाटाने साजरे झाले. ही नाटकें येत्या फेब्रुआरींत रंगभूमीवर येऊं शकतील असें दिसतें. 'अंमलदार'च्या मुहूर्ताचे प्रसंगीं संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांनी 'अंमलदार'चे लेखक प्रा. पु. ल. देशपांडे यांनी आपलें नाटक संघाच्या मंदिरनिधीच्या सहाय्यार्थ विनाशुल्क दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. श्री. नाना जोग यांनीहि आपले 'भारती' मंदिरनिधीच्या सहाय्यार्थ विनाशुल्क दिलें आहे. या नाटकाच्या मुहूर्ताचे प्रसंगीं संघाचे सरचिटणीस श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी आणि नाटककार श्री. जोग यांनीहि उपस्थित बंधुभगिनींना मंदिरनिधीला हातभार लावण्याची विनंति केली.

श्री. गोविंदराव टेंबे यांचा सन्मान

दिनांक ७ नोव्हेंबर रोजीं सायंकाळी ६ वाजता वि. सा. संघाच्या कार्यालयांत महाराष्ट्राचे ख्यातनाम नाटककार व नाट्य-संगीत-कलाग्रणी श्री. गोविंदराव टेंबे यांचा सत्कार संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. श्री. टेंबे यांच्याबरोबरच ग्वाल्हेरचे भूतपूर्व गायक श्री- रामभाऊ गुळवणी व सुप्रसिद्ध तरुण गायक श्री. भीमसेन जोशी हेहि हजर होते.

सुरुवातीला संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई या पाहुण्यांचे स्वागत करतांना म्हणाल्या, "श्री. टेंबे यांनी मराठी रंगभूमी उत्कर्ष कालांत आपल्या अभिनयाने व संगीताने महाराष्ट्राला भारून टाकलें हो , नाटककार, संगीतज्ञ व संगीत-दिग्दर्शक अशा विविध नात्यांनी महाराष्ट्राल वेत असलेल्या गोविंदरावांच सत्कार करतांना आम्हाला अत्यानंद होत आहे.

त्यानंतर वि. सा. संघाचे चिटणीस श्री. रा. पु. सगदेव यांनी पुष्पहार समर्पण करून श्री. टेंबे यांचा सत्कार केला. श्री. नानासाहेब जोग आणि श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांची श्री. टेंबे यांच्याबद्दल परिचयात्मक भाषणें झालीं.

नंतर वि. सा. संघाने केलेल्या आपल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून श्री. गोविंदराव टेंबे यांनी 'रंगभूमीवरील नीति आणि रीति' यावर भाषण केलें.

शेवटीं श्री. सुरेंद्र ढोळके यांनी श्री. गोविंदराव टेंबे यांचे व उपस्थितांचे आभार मानल्यावर कार्यक्रम संपला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ